दैनिक

www.sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • अंक ७० • RNI : MAHMAR/2023/87818 • शनिवार दि.४ जानेवारी २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# शरद पवार आणि छगन भुजबळ एकाच मंचावर मुख्यमंत्र्यांसोबतही केला एकाच गाडीतून प्रवास

## भुजबळ यांच्याशी दुसरी कोणतीही चर्चा झाली नाही–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### स्मारक चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी आमचे प्रयत्न;दहा एकर जागेतील नियोजित स्मारक

**सातारा (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नाराज असलेले ज्येष्ठ नेते छगन भुजबळ या दोघांची आज पुन्हा एकदा भेट झाली आहे. सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सातारा जिल्ह्यात आयोजित कार्यक्रमाच्या निमित्ताने या दोन्ही नेत्यांनी एकाच गाडीतून प्रवास केला. इतकेच नाही तर या कार्यक्रमात झालेल्या भाषणात छगन भुजबळ यांनी देवेंद्र फडणवीस यांचे तर फडणवीस यांनी छगन भुजबळ यांचे कौतुक केले.

मंत्रिमंडळ स्थान न मिळाल्याने छगन भुजबळ हे नाराज आहेत. त्यांनी आपली नाराजी उघडपणे व्यक्त केली होती. मात्र त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या भेटीनंतर माध्यमांशी बोलताना भुजबळ यांनी फडणवीस आपल्याशी नंतर चर्चा करणार असल्याचे सांगितले होते. त्या भेटीनंतर



आज पुन्हा या दोन्ही नेत्यांची भेट झाली आहे. मात्र या भेटीत दोघांमध्ये काय चर्चा झाली? याची माहिती अद्याप समोर आलेली नाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत या कार्यक्रमात भुजबळ तसेच मंत्रिमंडळातील सदस्य पंकजा मुंडे , शंभूराज देसाई , शिवेंद्रसिंहराजे भोसले , जयकुमार गोरे , मकरंद पाटील , आदिती तटकरे आणि काही आमदार उपस्थित होते.क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या मूळ गावी खंडाळा तालुक्यातील नायगाव येथे महाराष्ट्र शासन एक चांगला प्रकल्प उभा करत आहे. हे स्मारक चांगल्या पद्धतीने व्हावे यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत. त्याचे प्रेझेंटेशन मला दाखवले असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सातारा जिल्ह्यातील नायगाव येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या १९४ वा जयंती उत्सव व भारतीय स्त्री मुक्ती दिन या निमित्ताने आयोजित कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व त्यांचे मंत्रिमंडळातील सहकारी आले असताना ते अभिवादन केल्यानंतर पत्रकारांशी बोलत होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्त्री शिक्षणाचे मुहूर्तमेढ रोवणाऱ्या व विधवा टाकून दिलेल्या व कुमारी मातांचे त्यांनी पुनर्वसन केले अशा महान क्रांतीज्योती सावित्रीबाईंना अभिवादन केले असे सांगून नायगाव येथील प्रस्तावित क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या दहा एकर जागेतील नियोजित स्मारकाच्या संदर्भात माहिती दिली. सावित्रीबाई फुले यांना साजेचे असे स्मारक महाराष्ट्र शासन उभे करणार आहे व त्या स्मारकाच्या आराखड्याचे प्रेझेंटेशन सुद्धा मी पाहिले आहे. लवकरच ते उभे राहील असेही फडणवीस म्हणाले.

#### भुजबळ यांच्याशी दुसरी कोणतीही चर्चा झाली नाही– देवेंद्र फडणवीस

**छगन भुजबळ यांच्याशी आपली चर्चा झाली त्यानुसार काय नेमकी चर्चा झाली असे विचारले असता मुख्यमंत्री फडणवीस यांनी सावित्रीबाई फुले आणि महात्मा फुले यांचे कार्य पुढे नेण्याची व समता युक्त समाज तसेच संविधान प्रेमी समाज कसा निर्माण करता येईल यासाठी काय करावे लागेल याविषयी छगन भुजबळ यांच्याशी चर्चा झाल्याचे आणि दुसरी कोणतीही चर्चा झाली नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. फडणवीस यांनी नायगाव येथील सावित्रीबाई फुले यांच्या स्मारका अभिवादन केल्यानंतर सावित्रीबाई फुले यांच्या मुळ घरी उभारलेल्या चित्र प्रदर्शनाची व घरातील वस्तूंची पाहणी केली.**

# आ.आशिष देशमुख यांची धडक कारवाई वाळू व तंबाखूच्या अवैध वाहतुकीवर धाड

### आडमार्गाने वाहतूक करणारे ट्रक पकडले;मध्यप्रदेशकडे जाणारी वाहतूक रोखली

**नागपूर । प्रतिनिधी**

नागपूर जिल्ह्यात वाळू व तंबाखूच्या अवैध वाहतुकीवर धडक कारवाई करण्यात आली आहे. रॉयल्टी आणि टोल वाचवण्यासाठी राष्ट्रीय महामार्ग सोडून आडमार्गाने मध्यप्रदेशकडे जाणाऱ्या ट्रकला अडवण्यात आले. या मोहिमेत भाजप आमदार आशिष देशमुख यांनी पुढाकार घेत, ट्रकवर चढून मालाची तपासणी केली व आपली तीव्र भूमिका मांडली.

आमदार आशिष देशमुख यांनी सांगितले की, आडमार्गाने वाळू व तंबाखूची अवैध वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू आहे. हे ट्रक ओव्हरलोड असून, रॉयल्टी आणि टोल वाचवण्यासाठी ग्रामीण रस्त्यांचा वापर करत आहेत. यामुळे रस्त्यांचे मोठे नुकसान होत आहे. याशिवाय, लाखो रुपयांचा कर



चुकवण्याचा गंभीर प्रकारही घडत आहे.

आमदार देशमुख यांच्यासोबत स्थानिक भाजप पदाधिकाऱ्यांनीही या मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. ट्रक पकडण्याची ही कारवाई काँग्रेस नेत्यांच्या संबंधांवर बोट ठेवणारी ठरली असून, भाजपने त्यासंदर्भात जोरदार पवित्रा घेतल्याचे दिसत आहे.आमदार देशमुख यांनी पोलिसांना अवैध वाहतुकीवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले. त्यांनी असेही सांगितले की, वाळू, सुपारी, आणि तंबाखू माफियांवर कारवाई झालीच पाहिजे. त्यांचा करचुकवेगिरीचा हा प्रयत्न यापुढे खपवून घेतला जाणार नाही.या घटनेमुळे नागपूर व आसपासच्या भागातील अवैध वाहतूक प्रश्न पुन्हा चर्चेत आला आहे. भाजपच्या या कृतीमुळे प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

# समता परिषदेच्या नावाने पक्ष काढावा आम्ही युती करू:जानकरांनी दिला सल्ला

**मुंबई (वृत्तसंस्था)**

राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांना मोठा सल्ला दिला आहे. छगन भुजबळ यांनी समता परिषदेच्या नावाने पक्ष काढावा, आम्ही तुमच्यासोबत युती करू, असे महादेव जानकर यांनी भुजबळ यांना सल्ला दिला आहे. यावर आता छगन भुजबळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



समता परिषदेच्या नावाने एखादा पक्ष काढा या महादेव यांनी दिलेल्या सल्ल्यावर छगन भुजबळ यांनी 'ठीक आहे', अशी प्रतिक्रिया दिली आहे. आता ही प्रतिक्रिया नेमके कोणत्या उद्देशाने होते ते मात्र स्पष्ट नाही. मात्र छगन भुजबळ यांना मंत्रिपद न मिळाल्याने ते नाराज आहेत हे तर सर्वांनाच समजले आहे. त्यानंतर भुजबळ काही दिवसांसाठी परदेशात देखील गेले होते. तिथून परत आल्यावर त्यांनी आता पत्रकारांना संवाद साधण्यास सुरू केले आहे.एका वृत्तवाहिनीशी संवाद साधताना महादेव जानकर यांना छगन भुजबळ यांच्यावर अन्याय झाला आहे असे वाटते का? असा प्रश्न विचारला तेव्हा जानकर म्हणाले, ओबीसींची अशीच अवस्था होणार आहे. ज्या समाजाचे दल आहे, त्या समाजाला बळ आहे. अन्याय झाला म्हणून मी आता बोलू शकणार नाही. कारण आपला पक्ष नाही. आपण याचिकाकर्ते आहोत. देणारे बनणारे असाल, तर आम्ही आमचे दल केले आहे. आम्ही त्यांना सांगितले आहे की तुम्ही समता परिषदेच्या नावाने एखादा पक्ष काढा, आम्ही तुमच्याबरोबर युती करू. त्यांनी जर हा निर्णय घेतला तर चांगले होईल. आज सावित्रीबाई फुलेंच्या जयंतीदिवशी त्यांनी ते करावे. त्यांनी हा निर्णय घेतला तर चांगले होईल. आताच्या नाही पुढच्या पिढीचेही भले होईल, असे महादेव जानकर म्हणाले.पुढे बोलताना महादेव जानकर यांनी भाजप, काँग्रेस पक्षावर टीका केली आहे. जानकर म्हणाले, मागीतल्याने भीक मिळते, हक्क मिळत नाही त्यामुळे मागण्यापेक्षा देणारे झाले पाहिजे. ओबीसीबाबत भाजप आणि काँग्रेसची पण नियत चांगली नाही. राज्यात ईव्हीएम सेट करण्यात आला होता म्हणून आमचे मतही भाजपला वळवण्यात आले आहेत. ईव्हीएम गळा घोटण्याचे काम करत असल्याची टीका देखील यावेळी जानकर यांनी केली आहे.

# आत्मनिर्भरतेसाठी शिक्षणासोबत कौशल्य हवे–ना.नितीन गडकरी

**नागपूर । प्रतिनिधी**

शिक्षणासोबत कौशल्याची जोड दिल्यास आत्मनिर्भरतेचे मार्ग अधिक सोपे होतील, असे मार्गदर्शन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आदिवासी युवकांना केले. नागपूर येथील पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित आदिवासी विकास विभागाच्या राज्यस्तरीय क्रीडा संमेलनाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.ना.गडकरी म्हणाले, विविध आव्हानांवर मात करत, गुणवत्तेच्या बळावर तुम्ही या राज्यस्तरीय स्पर्धेत पोहोचला आहात. आता कौशल्याच्या जोरावर तुमचे भविष्य अधिक उज्ज्वल करण्याची वेळ आली आहे. शिक्षकांनी मुलांच्या सुप्त गुणवत्तेला



वाव देत त्यांच्या स्वप्नांना आकार द्यावा.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, आदिवासी भागातील मुलांच्या शिक्षण व कौशल्यविकासासाठी शासन कटिबद्ध आहे. आश्रम शाळा व निवासी शाळांच्या माध्यमातून साडेचार लाखांहून अधिक आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. या क्रीडा संमेलनातून आदिवासी युवकांना नवी ऊर्जा मिळेल व कुशल क्रीडापटूंना योग्य दिशा सापडेल.कार्यक्रमाची सुरुवात अमरावती, ठाणे, नाशिक व नागपूर विभागातील ३० प्रकल्पांतील १,८७० खेळाडूंच्या मानवंदनेने झाली. गोंडी भाषेतील स्वागत गीत व पारंपरिक आदिवासी नृत्यांनी समारंभाला रंगत आणली.१४, १७ व १९ वयोगटातील सांघिक व वैयक्तिक खेळांच्या स्पर्धांमध्ये राज्यातील १,९१७ आदिवासी खेळाडू सहभागी झाले आहेत. नागपूर विभागातील गडचिरोली जिल्ह्यातील हेमलकसा येथील विद्यार्थ्यांनी मलखांब व ब्राइटर माईंड उपक्रमांचे प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांची मने जिंकली.कार्यक्रमाचे संचालन जवाहर गाढवे यांनी केले, तर नागपूर विभागाचे अपर आयुक्त रविंद्र ठाकरे यांनी आभार मानले. यशस्वी आयोजनासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# बच्चू कडू यांनी दिला अध्यक्षपदाचा राजीनामा

**मुंबई (वृत्तसंस्था)**

प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण अभियान अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहीत त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. राजीनामा दिल्यानंतर असलेली सुरक्षा सुद्धा काढूहण टाकावी, कुठली सुरक्षा ठेवण्यात येऊ नये, असे सुद्धा बच्चू कडू यांनी पत्रात म्हंटले आहे. तसेच दिव्यांगांशी बेईमानी कदापि शक्य नसल्याचे कडू यांनी म्हंटले आहे.

दिव्यांगांसोबत बेईमानी कदापि शक्य नाही म्हणून मी माझ्या पदाचा राजीनामा देत असल्याचे बच्चू कडू यांनी म्हंटले आहे. मंत्रालय निर्मितीनंतर आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधा मिळाल्या नसल्याने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. बच्चू कडू त्यांच्या पत्रात म्हणाले, इतर राज्यांपेक्षा दिव्यांगांना महाराष्ट्रामध्ये मिळणारे मानधन सर्वात कमी आहे. मिळणारे मानधन वेळेवर कधीच मिळत नाही. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये पाच टक्के निधी खर्च केला जात नसल्याचे देखील कडू यांनी त्यांच्या पत्रात म्हंटले आहे.बच्चू कडू म्हणतात, अजूनही स्वतंत्र मंत्री आणि सचिव पद या मंत्रालायसाठी नेमण्यात आलेला नाही. जिल्ह्याच्या ठिकाणी स्वतंत्र कार्यालय सुद्धा नाही. पदभरती सुद्धा करण्यात आलेली नाही. इंटर अनेक गोष्टी झाल्या नसल्याचे बच्चू कडू यांनी पत्रात म्हंटले आहे. तसेच या पदावर राहून ते होणार अशी शक्यता मावळली आहे. म्हणूनच दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी मला आंदोलन करावी लागणार असल्याने पदावर राहून आंदोलन करू शकत नाही, असे स्पष्ट मत व्यक्त केले आहे.

# अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे क्शन मोडवर:राज्याच्या पुरवठा विभागाची व्हीसीद्वारे घेतली बैठक,१०० टक्के धन्य वितरणाच्या केल्या सूचना

**बीड । प्रतिनिधी**

डिसेंबर महिन्यातील धान्य वितरणाच्या अनुषंगाने राज्याचे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री धनंजय मुंडे आज क्शन मोडवर आले आहेत. डिसेंबर महिन्यात राज्यात प्राप्त नियतनाच्या एकूण ९२.०९% धान्याचे वितरण झाले असून, उर्वरित वितरणामध्ये आलेल्या अडचणींच्या अनुषंगाने आज धनंजय मुंडे यांनी सबंध राज्याच्या पुरवठा विभागाची व्हीसीद्वारे बैठक घेतली.

ई – पॉस मशीन वरील अडचणी, पोर्टलचे सर्वर डाऊन, यांसह विविध अडचणींची तसेच धान्य वितरणाची जिल्हा निहाय वस्तुनिष्ठ आकडेवारी धनंजय मुंडे यांनी त्या त्या जिल्ह्याच्या जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. ठाण्यात सर्वाधिक ९८.५९ तर धुळे जिल्ह्यात सर्वात कमी ८१.६९% इतके धान्य वितरण डिसेंबर महिन्यात झाले असून ही आकडेवारी शंभर टक्क्यांकडे घेऊन जाण्यासाठी ऑनलाईन व अन्य तांत्रिक अडचणी दूर करण्यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी विभागाला निर्देश दिले असून या संदर्भात सर्व संबंधितांची पुढील आठवड्यात आणखी एक बैठक घेणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी विभागाला निर्देश दिले आहेत.सर्वर डाऊन असणे, किंवा अन्य कारणांनी ज्या ज्या जिल्ह्यांमध्ये विविध योजनेतील लाभार्थींना धान्य वितरण डिसेंबर महिन्यात होऊ शकले नाही त्यांना या महिन्यांमध्ये मुदतवाढ देण्याबाबतचे प्रस्ताव तातडीने देण्याबाबतही धनंजय मुंडे यांनी संबंधित जिल्ह्यांना निर्देश दिले आहेत.

भंडारा जिल्ह्यातील उर्वरित साखर उपलब्ध करून देणे त्याचबरोबर नागपूर विभागातील पुरवठा निरीक्षक व अन्य रिक्त पदे भरून देण्याबाबतचा प्रस्ताव देखील स्वतंत्ररीत्या मागवण्याबाबत धनंजय मुंडे यांनी संबंधितांना या बैठकीत निर्देश दिले आहेत. एफसीआय कडे विविध करार काही दिले व अन्य असलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने पुढील आठवड्यातील बैठकीमध्ये त्यावर निर्णय घेतला जाईल असेही धनंजय मुंडे यांनी यावेळी सांगितले.विविध जिल्ह्यांमध्ये ज्या ठिकाणी धान्याचे रॅक उतरवले जातात, त्या भागातील रस्ते व अन्य सुविधांच्याबाबतही स्वतंत्र आढावा घेऊन निर्णय घेण्यात येईल असेही धनंजय मुंडे म्हणाले आहेत. ई – पॉस मशीनवर डेटा उपलब्ध करून देणे, सर्वर डाऊन च्या समस्या यासह सर्वच्या सर्व तांत्रिक अडचणी तातडीने दूर करण्यासंदर्भात धनंजय मुंडे यांनी स्वतंत्र निर्देश दिले आहेत.या बैठकीस अन्न व नागरी पुरवठा विभागाचे सहसचिव, उपसचिव, शिधावाटप संचालनालयाचे नियंत्रक, पुरवठा विभागाचे सर्व उपयुक्त तसेच राज्यातील सर्व जिल्ह्याचे जिल्हा पुरवठा अधिकारी व उपनियंत्रक आदी उपस्थित होते.



# खासगी सहाय्यकाची नियुक्ती केल्यास तलाठ्यावर होणार कारवाई

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

राज्यात अनेक ठिकाणी कामगार तलाठी यांचे कार्यालय खासगी ठिकाणी सुरू आहेत. त्याचबरोबर अनेक तलाठ्यांनी आपल्या हाताखाली शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्तींची परस्पर नियुक्ती केल्या असल्याची तक्रार राज्य लाचलुचपत विभागाच्यावतीने शासनाकडे करण्यात आली होती.

महसूल विभागाला तक्रार प्राप्त झाल्यानंतर कक्ष अधिकार्यांच्यावतीने अखेर अशा प्रकारचे वर्तन करणार्या तलाठ्यांवर कारवाई करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

राज्याच्या अपर महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई यांनी सापळा पडताळणी कारवाई दरम्यान तलाठी हे त्यांचे शासकीय कामकाज एखाद्या खासगी कार्यालयातून करतात.

तसेच त्यांची शासकीय कामे करण्यासाठी अनधिकृतपणे खासगी व्यक्तींची नियुक्ती केली आहे. अशा व्यक्तीकडून शासकीय कामे करवून घेतली जातात. तसेच खासगी कार्यालयात शासकीय दस्तावेज ठेवतात. ही बाब कारवाईसाठी शासनाच्या निदर्शनास आणून दिली आहे. त्यानुषंगाने कक्ष अधिकारी यांनी आदेश दिले आहे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहितामधील तरतुदीनुसार ग्राम महसूल अधिकारी, तलाठी यांची कर्तव्ये व जबाबदार्या नमूद केलेल्या आहेत. सदर कर्तव्य व जबाबदार्या पार पाडताना ग्राम महसूल अधिकारी यांनी शासनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९ अन्वये प्रत्येक शासकीय कर्मचारी, अधिकारी यांनी त्यांचे कर्तव्य पालन करताना, वर्तणूकविषयक नियम विहित करण्यात आलेले आहेत. सदर नियमांचे पालन प्रत्येक शासकीय कर्मचारी,अधिकारी यांनी करणे आवश्यक आहे.ग्राममहसूल अधिकारी हे नेमून दिलेल्या सज्जाच्या ठिकाणी काम करतात. सदर सज्जा कार्यालये शासकीय जागांमध्ये अथवा शासन मान्यता प्राप्त भाड्याच्या जागांमध्ये आहेत. त्यामुळे ग्राम महसूल अधिकारी यांनी शासकीय कामकाज खासगी कार्यालयातून करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. तसेच, ग्राम महसूल अधिकारी यांनी शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्ती, मदतनीस नेमण्याबाबत शासन स्तरावरून कोणत्याही सूचना देण्यात आलेल्या नाहीत.तलाठी हे शासकीय कामकाज खासगी कार्यालयातून करत असल्याचे, खासगी जागेमध्ये शासकीय दस्तऐवज ठेवत असल्याचे निर्दशनास आल्यास तसेच, शासकीय कामकाज करण्यासाठी खासगी व्यक्ती नेमत असतील तर संबंधित तलाठी यांच्याविरूद्ध शासनाच्या सध्याच्या नियमांतर्गत तात्काळ उचित कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.




# महापालिकेचे नाट्य संकुल चार महिन्यात नगरकरांच्या सेवेत-संग्राम जगताप

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**



महापालिकेच्या माध्यमातून नगरकरांसाठी नाट्य कलाकारांचे हक्काचे व्यासपीठ लवकरच उपलब्ध होणार आहे. सावेडी येथील प्रोफेसर कॉलनी चौकात सुरू असलेल्या नाट्य संकुलाच्या बांधकामाचे सिव्हिल वर्क अंतिम टप्प्यात आले असून उर्वरित काम चार महिन्यात पूर्ण होईल, अशी माहिती आमदार संग्राम जगताप यांनी दिली.

महापौरपदाच्या काळात या नाट्य संकुलासाठी निधी मिळवून सुरुवात केली होती. मात्र, अडथळे निर्माण होत राहिल्याने काम रखडले. यावर मात करत शासनाच्या माध्यमातून पुन्हा ५ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून घेण्यात आला. ठेकेदार बदलून कामाचा वेग वाढवण्यात आला आहे, असे संग्राम जगताप यांनी सांगितले.

नाट्य संकुलाच्या कामाची पाहणी करताना आमदार संग्राम जगताप यांच्यासमवेत आयुक्त यशवंत डांगे, माजी उपमहापौर गणेश भोसले, माजी नगरसेवक धनंजय जाधव, निखिल वारे, संजय चोपडा, राष्ट्रवादी काँग्रेसचे अभिजीत खोसे, शहर अभियंता मनोज पारखे, आर्किटेक मनोज जाधव, तसेच नाट्य क्षेत्रातील प्रमुख व्यक्तिमत्त्वे उपस्थित होती.

अहिल्यानगरला नाट्य परंपरेचा समृद्ध वारसा आहे. स्थानिक नाट्य कलाकार राज्यभर नावलौकिक मिळवत असून त्यांना हक्काचे व्यासपीठ मिळावे, यासाठी हे नाट्य संकुल उभे करण्यात येत आहे. नगरकरांच्या बहुप्रतिक्षित मागणीचे स्वप्न आता पूर्ण होणार आहे, असे संग्राम जगताप यांनी यावेळी नमूद केले.

# तलाठ्याने नवीन वर्षात केले लाचखोरीचे 'ओपनिंग';६,५०० रुपयांसह रंगेहात पकडले

**कोपरगाव । प्रतिनिधी**

तहसील कार्यालयातील लाचखोरीचे प्रकरण अजून ताजे असतानाच, कोपरगाव महसूल विभागातील तलाठी गणेश वैजनाथ सोनवणे आणि त्यांचे मदतनीस करण नारायण जगताप यांना ६,५०० रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. या घटनेमुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

साई सिटी परिसरात प्लॉट विकत घेतलेल्या तक्रारदाराने संबंधित प्लॉटची नोंद तलाठी कार्यालयात करण्यासाठी अर्ज केला होता. मात्र, तलाठी गणेश सोनवणे यांनी नोंद प्रक्रियेसाठी ६,५०० रुपयांची लाचेची मागणी केली. मदतनीस करण जगताप यांच्यामार्फत लाचेची रक्कम स्वीकारण्याच्या वेळी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दोघांनाही रंगेहात पकडले.




तक्रारदाराच्या तक्रारीवरून नगर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अप्पर पोलीस अधीक्षक अजित त्रिपुटे यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई करण्यात आली. घटनास्थळी कोपरगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षकही उपस्थित होते. दोन्ही आरोपींविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ च्या कलम ७(१२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यांच्याकडून ५०० रुपयांच्या १३ नोटा जप्त करण्यात आल्या आहेत.

नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच महसूल विभागातील लाचखोरीचा प्रकार उघडकीस आल्याने तालुक्यात संतापाचे वातावरण आहे. प्रशासनाने अशा प्रकरणांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे

# भाजपा वतीने सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी




**कोपरगाव । प्रतिनिधी**

अज्ञानाच्या अंधकारात ज्ञानाचा प्रकाश पसरविणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त आज कोपरगाव येथील भाजपा संपर्क कार्यालयात जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमात त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी भाजपा शहराध्यक्ष डि. आर. जी. काले, तालुका युवा मोर्चा अध्यक्ष अमोल गवळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात गोपीनाथ गायकवाड, सुशांत खैरे, वैभव गिरमे, दादासाहेब नाईकवाडे, राजेंद्र बागुल, हाजी नशिरभाई सैय्यद, खालिकभाई कुरेशी, दीपक जपे, जगदीश मोरे, विष्णुपंत गायकवाड, जयप्रकाश आव्हाड, रोहन दरपेल, सतिश रानोडे, इलियासभाई खाटीक, हाशमभाई शेख, शंकर बिर्हाडे, चांगदेव घुले, मनोज निलख, शाम आहेर, हुसेनभाई सैय्यद आदी मान्यवर सहभागी झाले होते. या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव करून त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प केला.

# पोपटराव आनंदा बनसोडे कॅलेंडर प्रकाशन सोहळा डीवायएसपी वामणे यांच्या हस्ते उत्साहात पार पडला



**शिर्डी । प्रतिनिधी**

लोकनेते पोपटराव आनंदा बनसोडे यांच्या कॅलेंडर प्रकाशन सोहळ्याचे आयोजन शिर्डीतील हॉटेल साई संगम येथे मोठ्या उत्साहात करण्यात आले. या सोहळ्यात शिर्डीचे उपविभागीय पोलीस अधिकारी (डीवायएसपी) वामणे यांच्या हस्ते कॅलेंडरचे प्रकाशन करण्यात आले.

कार्यक्रमास शिर्डी पोलीस स्टेशनचे पीआय रामकृष्ण कुंभारे, वाहतूक विभागाचे पीआय देशमुख, राहाता पोलीस स्टेशनचे निरीक्षक गलांडे, साई मंदिर पोलीस निरीक्षक माळी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

राजकीय व सामाजिक क्षेत्रातील प्रमुख मान्यवरांमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष संदीप भाऊ सोनवणे, आरपीआय जिल्हाध्यक्ष पप्पू बनसोडे, राष्ट्रवादी शिर्डी शहराध्यक्ष दीपक गौंदकर, चेअरमन विठ्ठल पवार, नाना त्रिभुवन, किशोर दंडवते, राम गागरे, दुर्गा अण्णा कोराळे, सरपंच अमोल झिंजुर्डे, आकाश शेजवळ, बापूसाहेब चिंधे, सचिन धापटक, गणेश मुंडलिक, गणेश ढगे, केदार जोशी, जितू दिवे, अमोल वाघमारे, जॉन त्रिभुवन, लक्ष्मण झाडे, राहुल फुंदे, दतू खोशे, व संतोष धुळे यांचा समावेश होता.या कार्यक्रमात पोपटराव आनंदा बनसोडे यांच्या कार्याची स्तुती करण्यात आली व त्यांच्या सामाजिक योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. मोठ्या संख्येने नागरिक आणि कार्यकर्त्यांची उपस्थिती या सोहळ्याची शोभा वाढवणारी ठरली.

# दीपचंद चौधरी विद्यालयात ७५ व्या वर्धापन दिना निमित्त भव्य माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन

**सेलू । वार्ताहर**

विदर्भातील प्रसिद्ध दीपचंद चौधरी विद्यालयाला ७५ वर्षे पूर्ण झाली असून, शाळेच्या अमृत महोत्सव वर्षपूर्ती कार्यक्रम यशस्वीपणे साजरा करण्यात येत आहे. या कार्यक्रमात क्रीडा स्पर्धा, स्नेहसंमेलन, विविध शालेय स्पर्धा आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचा समावेश करण्यात आला आहे.

विशेष म्हणजे, ५ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत शाळेच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमिलन सोहळा-२०२५ आयोजित करण्यात आलेला आहे. या सोहळ्यात माजी गुरुजनांचा सत्कार, जुन्या मित्रांसोबत गप्पा, शालेय आवारातील भटकंती, 'एक बॅच, एक वृक्ष' अंतर्गत वृक्षारोपण, स्नेहभोजन व मनोरंजनाचे विविध कार्यक्रम होणार आहेत.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे माजी विद्यार्थी डॉ. प्रकाश खोडके, डॉ. ज्ञानेश्वर देवतारे आणि विनायक कामडी हे असणार आहेत. यासोबतच शाळेच्या प्राचार्या सौ. सुहासिनी पोहाणे (वंजारी) आणि शालेय संचालक मंडळाचे प्रमुख उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या व्यवस्थापनाने पाचशे रुपये नोंदणी सहयोग राशी ठेवली आहे. तसेच, माजी विद्यार्थ्यांचे व्हॉट्सअप ग्रुप सुद्धा तयार करण्यात आले असून, गुगल फॉर्मद्वारे सहभागी होण्याची प्रक्रिया सुरु आहे.

या मेळाव्यात सहभागी होऊन शालेय आठवणींना उजाळा देण्याची आणि मित्रपरिवाराशी गोड आठवणींचे पुनर्नवीनीकरण करण्याची एक उत्तम संधी आहे. शाळेच्या संस्थापकांनी दिलेल्या शालेय संस्कारांचा आदर राखत भविष्यातील पिढीला प्रोत्साहन देण्यासाठी हा मेळावा एक ऐतिहासिक आणि अविस्मरणीय क्षण ठरणार आहे.

# चव्हाण पाटील वस्ती शाळेत बाल आनंद बाजार संपन्न

**मोहोळ । प्रतिनिधी**

दैनंदिन जीवनात शैक्षणिक ज्ञानाबरोबरच आर्थिक ज्ञान, व्यवसाय व्यवहार ज्ञान आणि आर्थिक काटकसर वाढवण्यासाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, चव्हाण पाटील वस्ती वाफळे येथे २ जानेवारी २०२५, गुरुवार रोजी बाल आनंद बाजार आयोजित करण्यात आला होता.



या बाल आनंद बाजारात विविध दैनंदिन आहारात लागणारा ताजा भाजीपाला तसेच गरम गरम चविष्ट खाद्यपदार्थ शालेय विद्यार्थ्यांनी विक्रीसाठी आणले होते. शालेय परिसरात खरोखरच बाजाराचे स्वरूप निर्माण झाले होते. पालकांच्या अप्रतिम प्रतिसादामुळे विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

विद्यार्थ्यांनी सकाळी घरून बनवून आणलेले गरम कुरकुरीत पदार्थ सर्व माता, पालक, ज्येष्ठ नागरिक आणि शिक्षकांनी चांगलाच आस्वाद घेतला. या बाल आनंद बाजारामुळे विद्यार्थ्यांच्या आर्थिक ज्ञानात भर पडली आहे. बाजारात जवळपास ७ हजार रुपये पर्यंत आर्थिक उलाढाल झाली आहे. या बाजारात साक्षी वसेकर हिने जवळपास ८०० रुपये विक्री केली. गरम गरम भजी, पॅटीस, ढोकळा, भेळ, विविध फळे, ताजा भाजीपाला, आणि संपूर्ण किराणा मालाचे दुकान अशा प्रकारच्या विविध गोष्टींनी बाजार आकर्षक ठरला. या बाजाराच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका वर्षा अडसूळे, शिक्षक भडकवाड, तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत शिवाजी पाटील, उपाध्यक्ष नुतन गणेश वसेकर आणि सर्व सदस्य यांनी मेहनत घेतली.यावेळी शिवाजी पाटील, शरदचंद्र शिवाजी पाटील, अक्षय चव्हाण, संजय चव्हाण, गणेश वसेकर, पंडित पाटील, बापू चव्हाण, चेतन पाटील, संभाजी पाटील आणि वस्तीवरील सर्व विद्यार्थ्यांचे पालक, माता भगिनी तसेच केंद्रामधील शिक्षक बंधू उपस्थित होते.

# सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थिनीचा ठाणेदाराने स्वत:च्या खुर्चीवर बसवून केला सन्मान


## गोंडपिपरीत पोलीस स्थापना दिवस व सावित्री फुले जयंती साजरी

**गोंडपिपरी । सुरज माडूरवार**

२ जानेवारी हा दिवस संपूर्ण महाराष्ट्रात पोलिस स्थापन दिन म्हणून साजरा केला जातो. त्यानिमित्ताने २ ते ७ जानेवारी दरम्यान 'रायझिंग डे' सप्ताह अनेक शाळा-कॉलेजांमध्ये पोलिसांच्या वतीने आयोजित केला जातो. या सप्ताहात विद्यार्थ्यांना कायदेविषयक आणि स्वरक्षणाविषयक माहिती देऊन जनजागृती करण्याचा मानस असतो.

त्याचाच एक भाग म्हणून गोंडपिपरी पोलिस विभागाने स्व. लक्ष्मणराव कुंदोजवार ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांसोबत पोलीस स्टेशनच्या आवारात 'रायझिंग डे' व सावित्री फुले जयंती कार्यक्रम आयोजित केला. महाविद्यालय ते पोलीस स्टेशन अशी रॅली काढण्यात आली. ठाणेदार रमेश हत्तीगोटे यांनी विद्यार्थ्यांना 'रायझिंग डे'विषयी माहिती दिली आणि विद्यार्थ्यांना वाईट प्रवृत्तीपासून दूर राहण्याचे तसेच मुलींना आपले संरक्षण स्वतः करण्याचा सल्ला दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षाबद्दल मार्गदर्शन करून, सकारात्मक दृष्टिकोन ठेवून चांगला माणूस होण्याचा प्रयत्न करण्याचा उपदेश केला.

कार्यक्रमाच्या दरम्यान पोलीस स्टेशन मधील कामकाज, सायबर सुरक्षा, महिला सुरक्षा, ट्रॅफिक नियम व शस्त्राविषयी माहिती देण्यात आली. तसेच, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने महाविद्यालयातील विद्यार्थिनींना ठाणेदार यांच्या खुर्चीवर बसवून त्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात पिएसआय मंगेश कराडे, मरापे आणि पोलीस कर्मचारी, तसेच विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती



महाविद्यालयातील विद्यार्थिनींना ठाणेदार यांच्या खुर्चीवर बसवून त्यांचा सत्कार करण्यात आला.

# विकास कामांमध्ये कमी पडणार नाही खासदार नीलेश लंके यांची ग्वाही

**पारनेर । प्रतिनीधी**

पाच वर्षे आमदार असताना आपण पारनेर-नगर मतदारसंघात सुमारे १ हजार ८०० कोटी रूपयांची विकास कामे मार्गी लावली. यापुढील काळातही आपण विकास कामांमध्ये कमी पडणार नाही अशी ग्वाही खासदार नीलेश लंके यांनी दिली.



कोहकडी येथील १ कोटी २४ लाख ७३ हजार रूपये खर्चाच्या खंडेकर मळा येथील कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्यांचे खा. लंके यांच्या हस्ते भुमिपुजन करण्यात आले, त्यावेळी खा. लंके हे बोलत होते. यावेळी बोलताना खा. लंके म्हणाले, कोहकडी हा परिसर बागायत भाग आहे. या भागाला कुकडी कालव्याचे नियमित पाणी मिळावे यासाठी आपण यापूवही पुढाकार घेतला. यापुढील काळातही या भागाला पाणी कमी पडणार नाही. जेथे शक्य असेल तिथे पाणी आडविण्यास आपण प्राधान्य देणार आहोत. कोहकडी येथील टोणगेवाडी येथेही बंधारा मंजुर करण्यात आला असून त्याचे कामही लवकरच सुरू करण्यात येईल अशी ग्वाही लंके यांनी दिली. यावेळी सुदाम पवार, खंडू भुकन, अर्जुन भालेकर, गंगाराम बेलकर, प्रा. संजय लाकुडझोडे, कारभारी पोटघन, सरपंच सिमा पवार, वसंत कवाद, ठकाराम लंके, अमृताशेठ रसाळ, किसनराव रासकर, रूपेश ढवण, डॉ. आबासाहेब खोडदे, जालिंदर झरेकर, राजेश शेळके, जालिंदर तानवडे, नितिन चिकणे, भाउसाहेब आढाव, प्रदीप सोमवंशी, कांतीलाल शेळके, अण्णा बढे, विलास मदगे, संभाजी मदगे, बापू मदगे, प्रविण उदमले, बाजीराव कारखिले, कैलास डोमे, दत्ता शेंडगे, लहानू टोणगे, रामदास चौधरी, मल्हारी धरणे, सर्जेराव चौधरी, गोरख टोणगे, वाल्मीक टोणगे, जयवंत गायकवाड, विशाल गायकवाड आदी यावेळी उपस्थित होते.

### पवार आमचे आधारस्तंभ

**माजी सभापती सुदाम पवार हे आपले आधारस्तंभ आहे. प्रतिष्ठाणच्या माध्यमातून अनेक सामाजिक कामे माग लावण्यात त्यांचे योगदान आहे. नव्या वर्षाच्या पहिल्या दिवशी येथे विकास कामांचे भुमिपुजन करण्यात येते. यंदाही विकास कामांचे भुमिपुजन करून ही परंपरा कायम ठेवण्यात आली.**

**–खासदार नीलेश लंके,लोकसभा सदस्य**

# सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त हिंगणघाट येथे प्रेरणादायी कार्यक्रम

## स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी मार्गदर्शन

**हिंगणघाट । प्रतिनीधी**

तुळसकर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट अंतर्गत मातोश्री आशाताई कुणावार कला, वाणिज्य आणि विज्ञान महिला महाविद्यालयातील करिअर मार्गदर्शन समितीच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त प्रेरणादायी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.




कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. उमेश तुळसकर (अध्यक्ष, विद्या विकास शिक्षण संस्था, हिंगणघाट) होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मनोज गभने (एमपीएससी उत्तीर्ण, २००४ बॅच, ठाणेदार हिंगणघाट) यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच प्रमुख पाहुणे नागेश उगले (पोलीस निरीक्षक, हिंगणघाट) आणि संदेश मून (शैक्षणिक समुपदेशक) यांनीही विचार मांडले.कार्यक्रमात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा तयारी आणि सायबर क्राईमसारख्या संवेदनशील विषयांवर मार्गदर्शन करण्यात आले. विशेष अतिथी म्हणून जय जवान अकादमीचे संस्थापक सतीश तीमांडे आणि वाचनालय संचालक विशाल घाटूर्ले व राजश्री नंदनवार यांचा शाल आणि श्रीफळ देऊन सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. अभय दांडेकर यांनी केले, तर प्रास्ताविक प्रा. जमीर पटेल यांनी सादर केले. आभार प्रदर्शन प्रमोद जयूपुरकर यांनी काव्यात्मक शैलीत केले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी, आणि विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

# क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त समता फेस्टिवलचा समारोप समारंभ उत्साहात

**कोपरगाव । प्रतिनिधी**

साने गुरुजी यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी जयंती आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त समता प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित समता फेस्टिवलचा समारोप समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विवेक कोल्हे यांनी उपस्थिती लावली आणि या नावीन्यपूर्ण उपक्रमाचे कौतुक करत शुभेच्छा व्यक्त केल्या.समता प्रतिष्ठानने या वर्षीही आपल्या परंपरेला साजेसा सामाजिक उपक्रम राबविताना विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी खरा तो एकच धर्म, जगाला प्रेम अर्पावे या मुख्य विषयावर फेस्टिवल साजरा केला. तसेच, ग्राम स्वच्छता या सामाजिक विषयावरही विद्यार्थ्यांना प्रबोधन करण्यात आले.



समता फेस्टिवलमुळे विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाबरोबर तणावमुक्त आणि आनंददायी शिक्षणाचा अनुभव मिळतो. या वर्षी गावा-गावातील वास्तव समस्यांवर चर्चा घडवून आणत, विद्यार्थ्यांनी आपल्या सर्जनशीलतेच्या माध्यमातून समाधानात्मक उपाय सुचवले.समारोप सोहळ्याला समता प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रा. अर्जुन कोकाटे, येवला येथील प्रथितयश उद्योगपती सुशीलभाई गुजराथी, सुधाताई पाटील, निफाड येथील पेट्रोल पंप संचालक जयदत्त व्यवहारे, बालसाहित्यिक माधुरी माटे, दिनकर दाने, सामाजिक कार्यकर्ते अजिजभाई शेख, सेवानिवृत्त मुख्याध्यापक रामनाथ पाटील, तसेच विविध शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.या फेस्टिवलच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच सामाजिक भान आणि मूल्यांचा वारसा मिळावा, हा प्रतिष्ठानचा उद्देश यशस्वी ठरला आहे.

# अंगरच्या अंबुथवस्ती शाळेत चिमुकल्यांनी भरवला आनंद बाजार

**मोहोळ । प्रतिनिधी**

ता. ३ - जिल्हा परिषद प्राथमिक शाळा अंबुथवस्ती (अंगर) येथील विद्यार्थ्यांनी स्वतःच्या रानातील मेथी, चुका, पालक, आमटी, कोथिंबीर, कोबी, फ्लॉवर यासह इडली, वडा, चटणी, वडा पाव, भजी, पानीपुरी, भेळ अशा चविष्ट खाद्यपदार्थांचा विक्रीसाठी आनंद बाजार आयोजित केला.



सहशिक्षिका अर्चना खराडे आणि संतोष काळे यांच्या संकल्पनेतून विद्यार्थ्यांना व्यवहार ज्ञान मिळवण्यासाठी हा आनंद बाजार भरविण्यात आला. विद्यार्थ्यांनी आणि पालकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या बाजारामध्ये सात ते दहा हजार रुपयांची आर्थिक उलाढाल झाली.

प्रारंभी, अनगर केंद्राचे प्रभारी केंद्रप्रमुख महादेव माने, सहशिक्षिका सरस्वती वायचळ, प्रभारी मुख्याध्यापक सुरेश बोडके, शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष शितल गुंड यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले आणि लोकनेते (स्व.) बाबुराव अण्णा पाटील अनगरकर यांच्या प्रतिमेचे उद्घाटन करून बाजाराचा प्रारंभ झाला. खरेदीसाठी वस्तीवरील नागरिक आणि गावातील शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. यावेळी दीपक गुंड, आबा धावणे, जयश्री गुंड, श्रृती कोळी, संतोष सुरवसे, हैदर मुलाणी, सोमेश्वर कोळी, विलास भालके, अंबादास कारमकर यांच्यासह इतर अनेक उपस्थित होते.

# सर्वज्ञ कॉन्व्हेन्ट,शंकरपूर येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी



**चिमूर । प्रतिनिधी**

सर्वज्ञ कॉन्व्हेन्ट, शंकरपूर येथे ३ जानेवारी २०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष वसंता चौधरी यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे सदस्य पंकज रासेकर, संस्थेच्या सदस्या प्रेमा शेंडे, सर्वज्ञ कॉन्व्हेन्टच्या मुख्याध्यापिका यश्वकला ढोक आणि इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात सर्वज्ञ कॉन्व्हेन्टच्या विद्यार्थिनी विभावरी पाटील, त्रिशा चौधरी, सावी गजभिये यांनी सावित्रीबाई फुले यांच्या वेशभूषेत उपस्थित होऊन कार्यक्रमात रंग भरला. कार्यक्रमाचे संचालन आणि आभार प्रदर्शन आचल चौधरी हिने केले.

# सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा तपास एसआयटीकडे






**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणाचा तपास आता विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) सोपवण्यात आला आहे. या पथकाचे नेतृत्व आयपीएस अधिकारी डॉ. बसवराज तेली करतील. तपास अधिक सखोल होण्यासाठी १० सदस्यांचा समावेश असलेल्या या पथकाची नियुक्ती करण्यात आली आहे.

या प्रकरणात खंडणी प्रकरणाशी संबंधित वाल्मीक कराडला अटक करण्यात आली असून, केज न्यायालयाने त्याला १४ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. तसेच हत्येतील इतर आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस सक्रिय आहेत. एसआयटीमध्ये डॉ. बसवराज तेली (आर्थिक गुन्हे शाखा, सीआयडी, पुणे), अनिल गुजर, विजयसिंग जोनवाल, महेश विघ्ने, आनंद शिंदे, तुळशीराम जगताप, मनोज वाघ, चंद्रकांत काळकुटे, बाळासाहेब अहंकारे, आणि संतोष गित्ते यांचा समावेश आहे. सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या कारणांवर लवकरच प्रकाश पडेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# संत रामराव महाराज प्रेरणा पुरस्कार २०२५ साठी संजय जाधव यांची निवड

**उमरखेड । प्रतिनिधी**

उमरखेड तालुक्यातील इसापूर-पिंपळवाडी गावातील रहीवासी आणि सामाजिक कार्यात महत्त्वपूर्ण योगदान देणारे संजय उत्तम जाधव यांना संत रामराव महाराज प्रेरणा पुरस्कार २०२५ जाहीर झाल्याची घोषणा करण्यात आली आहे. बंजारा समाजाच्या विकासासाठी विशेष योगदान देणाऱ्या व्यक्तींना गौरवण्यासाठी या पुरस्काराचे वितरण केले जाते.



संत डॉ. रामराव महाराज बंजारा समाज विकास फेडरेशनच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. हा प्रतिष्ठित कार्यक्रम ११ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्रातील प्रसिद्ध तीर्थक्षेत्र पोहरादेवी (तहसील मानोरा, जिल्हा वाशीम) येथे भव्य स्वरूपात पार पडणार आहे.या समारंभाचे अध्यक्षस्थान आमदार धर्मगुरू बाबूसांगजी महाराज भूषविणार आहेत. या कार्यक्रमादरम्यान समाजासाठी अपार मेहनत घेतलेल्या आणि सामाजिक न्यायासाठी लढा देणाऱ्या अनेक मान्यवरांचा गौरव केला जाणार आहे.संत रामराव महाराज प्रेरणा पुरस्कार मिळाल्याने संजय जाधव यांच्या कार्याचा योग्य सन्मान झाला आहे. जाधव यांनी पत्रकारितेद्वारे समाजातील गरजू आणि शोषित व्यक्तींना न्याय मिळवून देण्यासाठी झटत अनेक उपक्रम राबवले आहेत. त्यांनी केलेल्या कामामुळे उमरखेड तालुक्यातील नागरिक त्यांच्यावर अभिमान व्यक्त करत आहेत.पुरस्कार सोहळ्यात समाजातील प्रत्येक घटकाने सहभागी होऊन जाधव यांना प्रोत्साहन द्यावे आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संस्थेने केले आहे. हा कार्यक्रम केवळ पुरस्कार वितरणाचा नव्हे, तर समाजसेवेतील योगदानाचा सन्मान करणारा दिवस असेल.

### संजय जाधव यांचे योगदान

**जाधव यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक न्याय, शैक्षणिक प्रबोधन, ग्रामीण विकास, शेतकऱ्यांचे हक्क आणि गरिबांना आधार देण्याच्या उद्देशाने सतत प्रयत्न केले आहेत. त्यांनी उमरखेड तालुक्यातील अनेक समस्यांवर आवाज उठवला आणि लोकांना न्याय मिळवून दिला सर्व नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी होऊन जाधव यांना शुभेच्छा द्याव्यात आणि त्यांच्या कार्याचा सन्मान करावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.**

# महावितरणच्या स्मार्ट मीटर जोडणीस मोहोळ तालुक्यातून तीव्र विरोध

**मोहोळ । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य विद्युत महावितरण कंपनी कडून मोहोळ उपवीजकेंद्रांतर्गत प्रत्येक गावांमध्ये वीज ग्राहकांच्या जुन्या मीटरच्या जागी नवीन स्मार्ट मीटर बसविण्याचा निर्णय घेतला आहे या निर्णयाला तालुक्यातील ग्रामस्थांचा तीव्र विरोध असून याबाबत महावितरणच्या अधिकाऱ्याकडे मोहोळ तालुक्यातील ग्रामस्थांच्या वतीने प्रत्येक गावागावातील ग्रामपंचायतीचे ठराव घेऊन ठरावाच्या प्रती महावितरणच्या उप कार्यकारी अधिकारी यांना देण्यात येणार असल्याची चर्चा मोहोळ तालुक्यात सुरू असल्याची माहिती समोर येत आहे.




कोणतीही पुर्व सुचना व ग्राहकांचे मत विचारात न घेता स्मार्ट मीटर बसवण्याचा घाट महावितरणने घातला आहे यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. मोहोळ तालुक्यातील ग्रामस्थ हे महावितरण च्या मोहोळ कार्यालयातील उप कार्यकारी अधिकारी यांना निवेदन देणार आहेत. विषेश म्हणजे जुने मीटर तसेच राहू द्यावे आणि नवीन स्मार्ट मीटर बसवण्याचे काम तात्काळ थांबवावे अशी मागणी जोर धरत असून महावितरण च्या मनमानी कारभाराला आता सोलापूर जिल्ह्यातून विरोध दर्शवला जात आहे, स्मार्ट मीटर बसवल्या नंतर वीज बिले वाढण्याची शक्यताही व्यक्त केली जात आहे शिवाय स्मार्ट मीटर च्या कार्यप्रणाली बाबत कोणतीही माहिती ग्रामस्थांना दिली जाता नसल्याने त्यांच्या मनात शंका निर्माण झाल्या आहेत. महावितरण कडून सुरू असलेल्या या कामामुळे स्थानिकामध्ये अस्वस्थता पसरली आहे ग्रामस्थांकडून हा निर्णय तातडीने मागे घेण्याची मागणी करण्यात येणार असून जनभावना लक्षात घेऊन महावितरण ने योग्य विचार करावा असे मोहोळ तालुक्यातील ग्रामस्थांचे म्हणणे आहे. तरी महावितरण ने स्मार्ट मीटर बसविणे त्वरित थांबवावे अन्यथा जन आंदोलने उभे केली जातील अशी सुद्धा मागणी नागरिकांतून करण्यात येत आहे.

# आ.लंघे यांनी पहिल्याच बैठकीत टोचले अधिकाऱ्यांचे कान शेतकऱ्यांच्या तक्रारी येऊ देऊ नये

**नेवासा । प्रतिनिधी**

माझ्याकडून कुठल्याही प्रशासकीय अधिकारी वर्गाला त्रास होणार नाही. मात्र तालुक्यातील कुठल्याही प्रशासकीय कार्यालयाबाबत शेतकऱ्यांच्या व सामान्य नागरीकांच्या तक्रारी नको, अशा सूचना देत आमदार विठ्ठलराव लंघे यांनी तालुक्यातील प्रशासकीय अधिकाऱ्यांचे पहिल्याच बैठकीत कान टोचले.येथील पंचायत समितीच्या सभागृहात गुरुवारी तालुक्यातील प्रशासकीय अधिकारी, प्रमुख कर्मचारी यांची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर तहसीलदार संजय बिरादार, पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, गटविकास अधिकारी संजय लखवाल, मुख्यअधिकारी सोनाली मात्रे, उपअभियंता सुरेश दुबाले यांच्यासह भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष माऊली पेचे, युवा नेते ऋषिकेश शेटे, अंकुश काळे, प्रदिप ढोकणे, गणेश लंघे, आदिनाथ पटारे आदी उपस्थित होते.

यावेळी तालुक्यातील महसूल, पोलीस यंत्रणा, पंचायत समिती, नगरपंचायत, दुय्यम निबंधक, मुळा पाटबंधारे, भूमी अभिलेख, एसटी महामंडळ, वीज वितरण कंपनी, जीवन प्राधिकरण विभाग, पशुसंवर्धन, जलजीवन, अशा एकूण २२ विभागाची बैठक घेण्यात आली. यात सामान्य नागरीकांच्या तक्रारी व शासकीय योजना, नवीन कार्यालय प्रस्ताव तसेच विविध अडचणी संदर्भात सविस्तर चर्चा झाली.यावेळी लंघे म्हणाले की, काळात अधिकाऱ्यांकडून कर्मचाऱ्यांकडून चुका झाल्या. त्या पुढील काळात सुधारणा झाल्या पाहिजेत. विविध विभागाचे अधिकारी नागरीकांना त्यांचे काम घेवून आले असता, कार्यालयात भेटत नाहीत. नागरीकांना कामासाठी चकरा माराव्या लागतात. त्यामुळे यापुढे अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्वतात बदल करावा. जुन्या कामाचा निपटारा करा. आजच्या पहिल्या बैठकीत अधिकारी सोबत साधक-बाधक चर्चा झाली.यात अतिशय समर्पक, अशी उत्तरे मिळाली. काम करताना अधिकारी यांच्या देखील अडचणी असतात. दोन्ही बाजू जाणून घेणे हे माझे काम आहे.यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न मी करेल, भविष्यात हातात हात घालून आपण सर्वजण कामे करू, लवकरच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना भेटून प्रमुख कार्यालयातील रिक्त पदे भरून काढू, जनतेला त्रास म्हणजे मला त्रास, आता जनता ही माझी जबाबदारी आहे.भविष्यात चांगले कामे होतील, हिच नूतन आमदार म्हणून अपेक्षा व्यक्त करतो.



# मी नाराज नाही, जलसंपदा खात्यात कामच काम’; नाराजीच्या चर्चांना विखेंचा फुलस्टॉप!



**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

महायुतीच्या खातेवाटपात जलसंपदा खाते विभागून दिल्याने राधाकृष्ण विखे पाटील नाराज आहेत अशा चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाल्या होत्या. परंतु, या चर्चांत काही तथ्य नाही याचा खुलासा पुन्हा एकदा मंत्री विखे पाटील यांनी स्वतःच केला आहे.

त्यामुळे विखे पाटील मंत्रिमंडळात नाराज असल्याच्या चर्चांना आता पूर्णविराम मिळाला आहे. मंत्री विखे पाटील काल पंढरपुरात होते. येथे त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याचा निर्णय एसआयटीच्या अहवालानंतरच होईल असे विखे पाटील म्हणाले आहेत.

मंत्रिमंडळाच्या खात्यांच्या वाटपावर कोणीही नाराज नाही, जलसंपदा खाते विभागून दिल्याने माझी नाराजी नाही, या खात्यात काम करण्यास भरपूर वाव आहे, नदीजोड प्रकल्प, तसेच तुटीचे गोदावरी खोरे यात कामाला चांगला वाव आहे, असे विखे पाटील यांनी स्पष्ट केले.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाच्या तपासाने वेग घेतला आहे. सीआयडी आणि पोलीस अशा दोघांकडूनही तपास केला जात आहे. मात्र या सर्वात वाल्मीक कराडच्याच नावाची सर्वाधिक चर्चा होत आहे. वाल्मीक कराड शरण आला असला तरी त्याच्यावर खंडणीच्या प्रकरणात गुन्हा दाखल आहे. तरी देखील या प्रकरणात वाल्मीक कराडवर आरोप होत आहे. त्यातच वाल्मीक कराड मंत्री धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय असल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे धनंजय मुंडे यांनी मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा यासाठी दबाव वाढू लागला आहे. परंतु, या प्रकरणाशी माझा संबंध नाही. मी राजीनामा का देऊ असे कालच मंत्री मुंडे यांनी स्पष्ट केले होते. या घडामोडी घडत असतानाच विखेंनीही मोठं विधान केलं आहे. त्यांच्या या विधानाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. बीड हत्या प्रकरणात सध्या कायदेशीर कारवाई सुरू आहे. एसआयटी चौकशीचा अहवाल येऊ द्या, अहवाल आल्यानंतर धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्याबाबत निर्णय घेतला जाईल, असं विखे पाटील यांनी म्हटलं आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार हे दोन्ही नेते पुन्हा एकत्र येतील, अशी चर्चा सुरू आहे. दोन्ही पवार एकत्र यावे यासाठी अजित पवार यांच्या मातोश्रींनी विठुराया चरणी साकडे घातले. याविषयी विचारलं असता विखे म्हणाले की, दोन पवार एकत्र यावे न यावे हा त्यांचा कौटुंबिक विषय आहे, कोणी काय साकडे घालावे त्यांची इच्छा, असं विखे म्हणाल

## सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी–माय छोट्या स्कूलच्या विद्यार्थ्यांचा प्रेरणादायी सहभाग

**अयोध्या नगर । नागपूर**

सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त माय छोट्या स्कूलमध्ये भव्य आणि प्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. शाळेच्या संचालिका चेतना खंडाळे अध्यक्षस्थानी होत्या, तर प्रमुख पाहुण्यांमध्ये अवनी खंडाळे, शिक्षिका नंदिनी जांभुळकर, हेमलता बारापत्रे, उत्कर्षा रामटेके, पल्लवी गायधने आणि पल्लवी कोरडे यांनी हजेरी लावली.



कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून झाली. यावेळी चेतना खंडाळे यांनी सावित्रीबाईंच्या संघर्षमय जीवनाचा उल्लेख करत, त्यांच्या कार्यामुळे महिलांनी शिक्षणाचा हक्क मिळवला आणि समाजात स्वतःची ओळख निर्माण केली, असे मत व्यक्त केले.

शाळेच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक सादरीकरणाद्वारे सावित्रीबाईंच्या कार्याचा गौरव केला. लहान मुलांच्या नृत्याने सर्वांचे लक्ष वेधले, तर वेशभूषा स्पर्धेत विद्यार्थ्यांनी ऐतिहासिक काळातील वेशभूषा उभी करत जुन्या काळाची झलक दाखवली. भाषण स्पर्धेत विद्यार्थ्यांनी प्रभावी शब्दांमध्ये सावित्रीबाईंच्या कार्याचा गौरव केला.

कार्यक्रमाचे संचालन पल्लवी गायधने यांनी केले, तर आभार प्रदर्शन पल्लवी कोरडे यांनी केले. पालक व शिक्षकांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी झाला.

संचालिका चेतना खंडाळे म्हणाल्या, सावित्रीबाईंच्या आदर्शांचा वारसा पुढे नेणे हीच खरी श्रद्धांजली आहे.

विद्यार्थ्यांनी सावित्रीबाईंच्या विचारांनी प्रेरित होऊन उज्ज्वल भविष्याचा संकल्प केला.

## फुलझरी येथे सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त पुस्तकांचे वाटप

### शिवसूर्य मित्र परिवाराचा स्तुत्य उपक्रम

**मूल । प्रतिनिधी**

आज, दिनांक ३ जानेवारी ला जिल्हा परिषद प्राथमिक शाळा फुलझरी येथे क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या विशेष निमित्ताने शिवसूर्य मित्र परिवार ग्रुप फुलझरीच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले.

पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके आणि पेन यांचे वाटप करण्यात आले, तर अंगणवाडीतील लहान मुलांना बालवाचन पुस्तके देऊन शिक्षणाची गोडी निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून कुंभरे व कोटणाके (प्राथमिक शाळा फुलझरी), चनकापुरे (वनरक्षक, फुलझरी), कोटणाके (चंद्रपूर) तसेच अंगणवाडी सेविका आणि मदतनीस उपस्थित होते. शिवसूर्य मित्र परिवार ग्रुपच्या सदस्यांसह पालकवर्ग व गावकऱ्यांनीही या उपक्रमात सहभाग घेतला.

शिवसूर्य मित्र परिवार ग्रुपने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. सावित्रीबाईंच्या शिक्षणविषयक विचारांवर आधारित अशा सामाजिक उपक्रमांची आज अधिक गरज आहे, असे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचा समारोप विद्यार्थ्यांना प्रेरणा देणाऱ्या विचारांनी करण्यात आला. उपस्थितांनी सावित्रीबाईंच्या विचारांचे पालन करून समाजासाठी योगदान देण्याचा निर्धार केला.

## देवळाली प्रवरात साई उत्सवास प्रारंभ

**राहुरी । प्रतिनिधी**

राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील श्री साई प्रतिष्ठान व शहरवासिय आयोजित साई चरित्र पारायण सोहळा व भव्य कीर्तन महोत्सवास आज २ जानेवारी रोजी सकाळी मोठ्या उत्साहात प्रारंभ झाला आहे.



देवळाली प्रवरा बाजारतळावर गेल्या ११ वर्षापासून महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या अधिपत्याखाली साई पारायण व कीर्तन महोत्सवाचे आयोजन केले जाते. यंदाचे हे १२ वे वर्ष आहे. काल सकाळी भक्तिमय वातावरणात देवळाली प्रवरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विकास नवाळे यांच्या हस्ते कलश पूजन व मूर्ती अधिष्ठान संपन्न झाले. यावेळी दिनेश जोशी व तुषार जोशी यांनी पौरोहित्य केले. त्यानंतर पारायण व्यासपीठ चालक गणेश मुसमाडे यांच्या नेतृत्वाखाली साई चरित्र पारायण सोहळ्यास प्रारंभ झाला. यावेळी शेकडो महिला व पुरूष पारायण वाचनास बसले आहेत. दररोज आरती, कीर्तन, नाश्ता व दोन वेळेस भव्य महाप्रसाद आदी दैनंदिन कार्यक्रम संपन्न होणार आहे. राज्यातील नामांकित कीर्तनकारांचे कीर्तन श्रवनाचा लाभ भाविकांना मिळणार आहे. भव्य दिव्य मंडपाची उभारणी देवळाली प्रवरा बाजारतळावर करण्यात आली आहे. या सोहळ्यात भाविकांनी सहभागी व्हावे असे आवाहन श्री. साई प्रतिष्ठान व शहरवासीयांनी केले आहे.

## जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना निवड श्रेणीतील पदोन्नती

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला यांना भारतीय पोलीस सेवेच्या (खझड) निवड श्रेणीत पदोन्नती मिळाली आहे. राज्य शासनाच्या गृहविभागाने काढलेल्या आदेशानुसार, महाराष्ट्रातील सुमारे ९ आयपीएस



अधिकाऱ्यांचा समावेश या पदोन्नतीत आहे. लवकरच राकेश ओला यांची पोलीस उपमहानिरीक्षक (DIG) म्हणून नियुक्ती होण्याची शक्यता आहे. २०१२ बॅचचे आयपीएस अधिकारी असलेल्या राकेश ओला यांनी आपल्या १३ वर्षांच्या सेवेत विविध महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. त्यांनी श्रीरामपूर आणि मालेगाव येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून, तसेच नागपूर शहर पोलीस उपायुक्त आणि नागपूर ग्रामीण पोलीस अधीक्षक म्हणून प्रभावी कामगिरी बजावली आहे. सलग १३ वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या आयपीएस अधिकाऱ्यांना भारतीय पोलीस सेवेच्या निवड श्रेणीत पदोन्नती देण्यात येते. राकेश ओला यांच्या कार्यकौशल्यामुळे त्यांना ही पदोन्नती मिळाली असून, त्यांच्या यशाबद्दल त्यांचे सहकारी व वरिष्ठ अधिकारी अभिनंदन व्यक्त करत आहेत. राकेश ओला यांच्या पदोन्नतीमुळे पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी प्रेरणादायी वातावरण तयार झाले आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी अनेकांकडून शुभेच्छा व्यक्त केल्या जात आहेत.

## ग्रा.पं.वाढोणा येथे सावित्री बाई फुले जयंती साजरी



**तळोधी (बा) । प्रतिनिधी**

नागभीड तालुक्यातील वाढोणा येथील ग्राम पंचायत कार्यालयात ३ जानेवारी २०२५ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या श्रद्धेने साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीसूर्य महात्मा जोतीराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला ग्राम पंचायत सरपंच देवेंद्र गेडाम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. जयंतीच्या औचित्याने १५व्या वित्त आयोगांतर्गत अपंग कल्याण निधीमधून ग्राम पंचायत अंतर्गत येत असलेल्या ८५ अपंग व्यक्तींना कुकर देण्यात आले. तसेच गावातील २१० दुकानदारांना ओला कचरा आणि सुका कचरा वर्गीकरणासाठी कचराकुंडी वितरित करण्यात आल्या.

यावेळी ग्राम पंचायत सरपंच देवेंद्र गेडाम, सदस्य अनिल डोर्लीकर, प्रदीप येसनसुरे, शशीकला ठाकरे, उषा पाटिल, सि.आर.पी. मंगला बोरकर, साधना बोरकर, शिल्पा कापगते तसेच सर्व अंगणवाडी सेविका, गावातील नागरिक व ग्राम पंचायत कर्मचारी उपस्थित होते.

## आचार्य दिनदर्शिकेचे आमदार माऊली आबा कटके यांच्या हस्ते प्रकाशन

**शिरूर । प्रतिनिधी**

शिरूर तालुका पदवीधर शिक्षक व केंद्रप्रमुख सभा या संघटनेच्या आचार्य दिनदर्शिकेचे शिरूर हवेलीचे लोकप्रिय आमदार माऊली आबा कटके यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. हा प्रकाशन सोहळा शिक्षक पतसंस्थेच्या शिरूर येथील आचार्य भवन कार्यालयात पार पडला.



याप्रसंगी पंचायत समिती सदस्य आबासाहेब सरोदे, शिरूर ग्रामीणचे सरपंच विठ्ठल घावटे, नगरसेवक नितीन पाचरणे, राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष रवी बापू काळे, विक्रम जाधव, शरद कालेवार, काका जाधवराव, अतुल गव्हाणे, विनायक पडवळ, पदवीधर शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष अनिल पलांडे, शिरूर तालुकाध्यक्ष कल्याण कोकाटे यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.यावेळी, राज्याध्यक्ष अनिल पलांडे यांनी शिरूर तालुक्यातील प्राथमिक शिक्षकांच्या प्रशासकीय अडचणी दूर करण्यासाठी आमदार माऊली आबा कटके यांच्याकडे सहकार्याची विनंती केली. यावर आमदार माऊली आबा कटके यांनी शिरूर-हवेली तालुक्यातील शिक्षकांच्या प्रशासकीय बाबी सोडवण्यासाठी जिल्हा परिषद व राज्य शासन स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. तालुकाध्यक्ष कल्याण कोकाटे यांनी सांगितले की, पदवीधर शिक्षक संघटनेच्या वतीने दरवर्षी आचार्य दिनदर्शिकेची छपाई करून शिरूर तालुक्यातील सर्व शाळांमध्ये व प्रत्येक शिक्षकांपर्यंत ती पोहोचवली जाते.

दिनदर्शिका प्रकाशनाच्या प्रसंगी संघटनेचे सदस्य युवराज थोरात, चंद्रकांत खैरे, पोपटराव गांधले, राहुल उकिरडे, वंदना पाचरणे, सविता गावडे, सीमा वाखारे, अनिल वाखारे, अशोक कर्डिले, मिलिंद आबनावे, मानसी थोरात, रामचंद्र नवले, प्रदीप गव्हाणे, संजय मांडगे, कैलास पाचरणे, आणि संभाजी जगताप इत्यादी सभासद उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांनी साकारली सावित्रीबाई फुले यांची वेशभूषा

## महिला मुक्ती दिनानिमित्त महिला पालक वर्गा करिता क्रीडा स्पर्धेचे आयोजन

**सिंदी । रेल्वे**

स्थानिक श्री संत केजाजी कॉन्व्हेन्ट घोराड येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळेचे संस्था संचालक तथा मुख्याध्यापक प्रशांत झाडे यांनी सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन केले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्याविषयी माहिती दिली.




शाळेतील नर्सरी, केजी वन, केजी टू च्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले तसेच महात्मा ज्योतिबा फुले यांची वेशभूषा परिधान केली होती. केजी टू च्या विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या विषयी आपल्या मनोगतातून विचार व्यक्त केले.

महिला मुक्ती दिनाचे औचित्य साधत शाळेतील महिला पालक वर्गासाठी क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धेत महिला पालक वर्गाचा मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवला. महिला मुक्ती दिनाच्या निमित्ताने महिला पालक वर्गाचा उत्साह आणि जोश पाहून, या कार्यक्रमाला आणखी एक विशेष रंग आला.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेच्या शिक्षिका सुवर्णा पिसे, स्वाती फट्टिंग, प्रिया शिंदे आणि आरती भुरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .

# भंडारा जिल्हा पोलिसांचे विशेष प्रदर्शनः 'रेझिंग डे' उपक्रम

## पोलिसांच्या कार्यपद्धतीची ओळख आणि सुरक्षा जागरूकतेचा संदेश

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा जिल्हा पोलिसांनी रेझिंग डे निमित्ताने एक विशेष पोलिस प्रदर्शन आयोजित केले आहे, ६ जानेवारी २०२५ पासून सुरू होऊन ८ जानेवारीपर्यंत भंडारा पोलिस मुख्यालयाच्या परेड ग्राउंडवर चालणार आहे. हे प्रदर्शन सकाळी १० वाजल्यापासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत नागरिकांसाठी विनामूल्य खुले असेल. या उपक्रमाचा मुख्य उद्देश नागरिकांना पोलिसांच्या कार्यपद्धतीची माहिती देणे आणि समाजात सुरक्षा जागरूकता वाढवणे हा आहे.

या प्रदर्शनात विविध पोलिस विभागांची ओळख करून दिली जाईल. यामध्ये सायबर डिवीजन, आर्थिक गुन्हे शाखा, महिला सुरक्षा विंग, ट्रॅफिक डिवीजन, बम डिटेक्शन आणि डिस्पोजल पथक, डॉग ट्रॅकर युनिट, शस्त्रास्त्रांचे प्रदर्शन, आणि फॉरेंसिक वॅन यांचा समावेश आहे. प्रत्येक विभागासाठी वेगळा स्टॉल तयार केला जाईल, जिथे नागरिकांना त्या विभागाच्या कार्यप्रणालीची, आधुनिक तंत्रज्ञानाची आणि सुरक्षेसाठी वापरण्यात येणाऱ्या उपकरणांची माहिती दिली जाईल.प्रदर्शनातील सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पोलिसांच्या कार्यपद्धतींचा थेट अनुभव घेण्याची संधी. उदाहरणार्थ, बम डिटेक्शन आणि डिस्पोजल पथक कसे कार्य करते, हे प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे दाखवले जाईल. सायबर डिवीजनच्या तज्ञांकडून सायबर गुन्ह्यांबद्दल माहिती मिळेल आणि ऑनलाइन सुरक्षेचे महत्त्व समजावून सांगितले जाईल. याशिवाय, ट्रॅफिक विभागाकडून रस्ते सुरक्षा आणि वाहतूक नियमांचे प्रात्यक्षिक होईल, ज्यामुळे नागरिकांमध्ये सुरक्षित वाहन चालविण्याविषयी जागरूकता वाढेल. विद्यार्थ्यांसाठी हे प्रदर्शन विशेषतः उपयुक्त ठरेल. पोलिस अधीक्षक नुरुल हसन यांनी विद्यार्थ्यांना मोठ्या संख्येने या प्रदर्शनात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित केले आहे. त्यांच्या मते, हे प्रदर्शन विद्यार्थ्यांमध्ये पोलिस दलाबद्दल आदर निर्माण करण्यात आणि त्यांच्यातील सुरक्षेची जाणीव वाढवण्यात महत्त्वाचे ठरेल.प्रदर्शनादरम्यान विविध कार्यशाळा आणि संवाद सत्रे आयोजित केली जातील. यामध्ये पोलिस आणि नागरिक यांच्यातील गैरसमजुती दूर करण्यासाठी चर्चा होईल. पोलिस दलाची भूमिका लोकशाही व्यवस्थेत महत्त्वाची आहे. त्यांच्या कार्यपद्धती समजून घेतल्याने नागरिकांमध्ये पोलिस दलाबद्दलचा विश्वास वाढेल आणि समाजात सुरक्षा आणि सहकार्याचे वातावरण निर्माण होईल.भंडारा जिल्हा पोलिसांचे हे प्रदर्शन नागरिकांसाठी एक अनोखी संधी आहे. यातून त्यांना पोलिसांच्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख होईल, तसेच पोलिसांच्या कार्यपद्धतीचे महत्त्व समजेल. त्यामुळे या प्रदर्शनाला भेट देऊन पोलिस दलाचे कार्य समजून घेण्यासह सुरक्षेत आपला सहभाग नोंदवावा.



# चिखली जिल्हा परिषद शाळेत बालिका दिन साजरा



**मोहोळ । प्रतिनिधी**

ता.३-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,चिखली (ता. मोहोळ) येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त बालिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व मुली सावित्रीबाई फुले यांच्या वेषात साड्या परिधान करून शाळेत आल्या होत्या आणि मी सावित्री बोलतेय हे स्वगत सादर केले.कार्यक्रमाच्या प्रारंभात उपस्थित मुलींनी सावित्री बाईंच्या प्रतिमेस पुष्पहार घालून त्यांना अभिवादन केले.यावेळी भाषणे,सावित्रीबाईंच्या ओव्यांचे गायन, रांगोळी स्पर्धा तसेच संगीत खुर्ची अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या.कार्यक्रमात मुख्याध्यापक विष्णू दाढे, राजेंद्र बनसोडे,रवि चव्हाण,दादा सरक आणि इतर शिक्षक उपस्थित होते.

# कोपरगावमध्ये लाचखोर तलाठ्यासह एक जण गजाआड

**कोपरगाव । प्रतिनिधी**

कोपरगाव येथील एका इमारतीमधील सदनिकेच्या खरेदी खताची नोंद सातबारा उताऱ्यावर लावण्यासाठी लाच मागणारा तलाठी व खासगी व्यक्तीला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने काल (ता. २) जेरबंद केले. गणेश वैजीनाथ सोनवणे (वय ४०, तलाठी, कोपरगाव, जि. अहिल्यानगर) व करण नारायण जगताप (वय २८, रा. साई सिटी परिसर, कोपरगाव, जि. अहिल्यानगर) अशी जेरबंद आरोपींची नावे आहेत.

कोपरगावमध्ये असलेल्या एका इमारतीमधील पहिल्या मजल्यावरील सदनिकेच्या खरेदी खताची नोंद सातबारा उताऱ्यावर लावण्यासाठी तलाठी सोनवणेला देण्यासाठी सहा हजार रुपये तर स्वतःसाठी ५०० रुपयांची मागणी करण जगतापने तक्रारदाराकडे केली होती. या व्यवहाराला तलाठी सोनवणे याची संमती होती. या संदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती. त्यानुसार पथकाने करण जगताप याला लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले. या प्रकरणी तलाठी सोनवणे व करण जगताप यांच्या विरोधात कोपरगाव शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात येत असल्याचे समजते.



गेवराई येथील राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे उदघाटन मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी खा. रजनीताई पाटील, आ. विजयसिंह पंडित तसेंच आयोजक महेश बेद्रे उपस्थित होते.

# हिवरे नागोबाचे येथे सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

**सोलापूर । प्रतिनिधी**

हिवरे नागोबाचे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त रांगोळी आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. अंगणवाडी सेविका, मदतनीस, बचतगट सख्या, तसेच सावित्रीबाईंच्या वेशातील शाळकरी मुलींनी सावित्रीबाईंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक शिवाजी साबळे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंभूराजे फरतडे आणि उपाध्यक्ष नितीन मगर यांनी उपस्थिती दर्शवली.



शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शंभूराजे फरतडे यांनी सावित्रीबाईंच्या कार्याची आठवण करून देताना विद्यार्थ्यांना प्रेरणा दिली. त्यांनी सांगितले की, स्त्रीशिक्षणाची सुरुवात करणाऱ्या सावित्रीबाई फुले यांनी केवळ शिक्षिका म्हणून नव्हे तर समाजसेविका आणि सामाजिक परिवर्तनासाठी कृतिशील कार्यकर्त्या म्हणून योगदान दिले. त्यांच्या विचारांवर वाटचाल करत विद्यार्थ्यांनी अभ्यासात यश मिळवून शाळा आणि गावाचा नावलौकिक वाढवावा .सावित्रीबाईंच्या वेशातील स्वराली बिरू ठोंबरे, राधा मोतीराम फरतडे, आणि धनश्री आबा ठोंबरे यांनी मनोगत व्यक्त करून सावित्रीबाईंच्या विचारांची महत्त्वाची आठवण करून दिली.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक सतिश सूर्यवंशी, जालिंदर हराळे, शिवाजी खरात, आणि पोपट दुधाळ यांनी परिश्रम घेतले. आभार प्रदर्शन शिवाजी खरात यांनी केले.

# आनंदवनात 'योग आणि आयुर्वेद' या विषयावर राष्ट्रीय परिषद व गुरुस्मरण

**वरोरा । प्रतिनिधी**

महारोगी सेवा समिती संचालित आनंद निकेतन महाविद्यालय, धन्वंतरी आयुर्वेद संशोधन संस्था, धुळे, चंद्रपूर जिल्हा आयुर्वेद समिती, नॅशनल इंटिग्रिटेड मेडिकल असोसिएशन, वरोरा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक ४ व ५ जानेवारी २०२५ ला गुरुवार्य वैद्य प्र. त. जोशी यांच्या जयंती निमित्त व श्रद्धेय बाबा व साधनाताई आमटे यांनी सुरु केलेल्या समाजकार्याला - महारोगी सेवा समिती, वरोरा ला यावर्षी ७५ वर्ष पूर्ण होत आहे हे दोन्ही औचित्य साधून गुरुस्मरण व 'योग आणि आयुर्वेद' या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद आनंदवन, वरोरा येथे होणार आहे. गुरुस्मरण व राष्ट्रीय परिषदेत संपूर्ण देशभरातील १८ राज्यांमधून ६०० व अधिक सहभागी उपस्थित राहणार असून, योगतज्ञ, आयुर्वेदतज्ञ, संशोधनकर्ते, वैद्य, शिक्षक, विद्यार्थ्यांपर्यंत सर्वांना एकत्र आणून योग आणि आयुर्वेद क्षेत्रातील नवकल्पना, आयुर्वेद औषधनिर्माण, पंचकर्म व षटकर्म अश्या विषयांच्या संशोधन आणि प्रगतीवर चर्चा करण्यात येणार असून शोध निबंध सादर करण्यात येईल. तसेच उद्योग,आणि संशोधन क्षेत्रातील शास्त्रज्ञ, नाविन्यपूर्ण तंत्रज्ञ, व्यावसायिक आणि नामांकित वक्त्यांना एक व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे या परिषदेचे उद्दिष्ट आहे.

सहभागींच्या परस्पर चर्चेतून विचारांची देवाणघेवाण होऊन योग आणि आयुर्वेद क्षेत्रातील नवीन दृष्टिकोन विकसित होण्यास मदत होईल. गुरुस्मरण व परिषदेचा उद्घाटन समारंभ महारोगी सेवा समितीचे सचिव डॉ. विकास आमटे, गोंडवाना विद्यापीठाचे कुलगुरू डॉ प्रशांत बोकारे, वैद्य नरेंद्र गुजराथी, वैद्य प्रवीण जोशी, सौ पल्लवी कौस्तुभ आमटे , आनंद निकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मृणाल काळे, कैवल्यधाम लोणावळा योग संस्थान चे संचालक डॉ. मन्मथ घरोटे आदींच्या उपस्थितीत ४ जानेवारी २०२५ ला संपन्न होईल.



यशस्वी आयोजनाकरिता प्रा तानाजी बायस्कर व डॉ गौरव हिवरे यांच्या नेतृत्वात नॅशनल इंटिग्रिटेड मेडिकल असोसिएशन, वरोरा , आनंद निकेतन महाविद्यालय, आनंदवन , धन्वंतरी आयुर्वेद शिक्षण संशोधन संस्था, धुळे, चंद्रपूर आयुर्वेद परिवारातील सर्व सदस्य कार्य करीत आहे.

# युवा शेतकऱ्याचा विहिरीत बुडून मृत्यू;सालोड (हिरापूर) येथील घटना

**वर्धा । प्रतिनिधी**

वर्धा तालुक्यातील सालोड (हिरापूर) येथे एका युवा शेतकऱ्याचा विहिरीत बुडून मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. शुभम पंजाब देशमुख (वय २६) असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. शेतीतील आर्थिक अडचणींमुळे तो गेल्या काही दिवसांपासून नैराश्यात होता. शुक्रवारी (३ जानेवारी) सकाळी विहिरीतून दुर्गंध येऊ लागल्याने शुभमचा मृतदेह सापडला.

शुभम देशमुख हे वडिलांसोबत शेती सांभाळत होते. मात्र शेतीचा खर्चही निघत नसल्याने त्यांच्यावर आर्थिक ताण होता. यामुळे शुभम काही दिवसांपासून नैराश्यात होता. तो दोन दिवसांपासून बेपत्ता होता. कुटुंबीयांनी त्याचा शोध घेतला, पण तो सापडला नव्हता.

शुक्रवारी सकाळी घराजवळील विहिरीतून दुर्गंध येऊ लागला. पाहणी केल्यावर शुभमचा मृतदेह विहिरीत तरंगताना दिसला. ही घटना पाहून कुटुंबीय हबकले. त्यांनी तातडीने सावंगी पोलिसांना माहिती दिली. सावंगी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, वर्धा येथे पाठवण्यात आला आहे.या प्रकरणी सावंगी पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली असून, कुटुंबीयांना या घटनेचा मोठा धक्का बसला आहे.



# जिल्ह्यातील नागरिकांनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावे-शेंडे

**भंडारा । प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीबाईंच्या संघर्षमय वाटचालीचा आणि समाज सुधारणेसाठी घेतलेल्या पुढाकाराचा गौरव केला पाहिजे. महिलांच्या सक्षमीकरणासाठी सावित्रीबाईंच्या विचारांचे अनुकरण करण्याची आज गरज आहे. सावित्रीबाईंच्या शिक्षणक्षेत्रातील मोलाच्या कार्याला उजाळा देत त्यांच्या विचारांचे स्मरण व्हावे म्हणून जिल्ह्यातील नागरिकांनी सावित्रीबाई फुले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावे असे प्रतिपादन जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वासंती शेंडे यांनी केले.

त्या सम्यक मित्र मंडळ व ई. एल. चर्च परिसराच्या वतीने आयोजित क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त ई. एल. चर्च परिसरात मार्गदर्शन करतांना बोलत होत्या.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ सामाजिक कार्यकर्त्या वासंती शेंडे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून बारणबाई कांबळे, शालीनी बागडे, शोभाबाई कांबळे, सुशिला मेश्राम, सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर व सम्यक मित्र मंडळ, ई. एल. चर्च परिसरातील



महिला व पुरुष उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाईंच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करण्यात आले. कार्यक्रमात छाया मेश्राम यांनी सावित्रीबाईंच्या शिक्षण प्रसारासाठीच्या अडथळ्यांवर प्रकाश टाकत, त्यांची कार्यपद्धती आणि विचारधारा यांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच स्त्री-शिक्षण आणि सामाजिक परिवर्तनातील सावित्रीबाईंच्या भूमिकेवर वसंत कांबळे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सावित्रीबाईंच्या कार्याला अभिवादन करून समाजात स्त्री-शिक्षणाचा सन्मान आणि सामाजिक एकता वाढविण्याचा संदेश देण्यात आला. सम्यक मित्र मंडळाचे या उपक्रमामुळे सर्वत्र कौतुक केले जात आहे. सम्यक मित्र मंडळ, ई. एल. चर्च परिसरातील महिला, पुरूषांनी आयोजित केलेला हा उपक्रम भविष्यातील समाज सुधारणेसाठी प्रेरणादायी ठरेल असे मत सामाजिक कार्यकर्ते विलास केजरकर यांनी व्यक्त केले.उपस्थित मान्यवरांनी सावित्रीबाई फुले यांचे संपूर्ण जीवन संघर्ष, शिक्षण प्रसार आणि सामाजिक सुधारणांसाठी वाहिलेले होते. या कार्यक्रमाने त्यांच्या कार्याचे स्मरण करून नवीन पिढीला प्रेरणा दिली. तसेच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणासाठी दिलेल्या योगदान व त्यांच्या कार्यावर विचारमंथन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता कांबळे व प्रास्ताविक प्रकाश बागडे यांनी केले तर उपस्थितांचे आभार दर्शना उके यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता शालिनी बागडे, सुनिता उके, श्रावण साखरकर, नेमीचंद बागडे, वसंत कांबळे, मंगेश निकुळे, प्रविण सांगेडकर, उमाशंकर निमजे, शुभम उके व सम्यक मित्र मंडळ, ई. एल. चर्च परिसरातील महिला, पुरूषांनी सहकार्य केले.

# ना.राधाकृष्ण विखे पाटील अहिल्यानगरचे पालकमंत्री होणार? राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या संभाव्य पालकमंत्र्यांची यादी

**राहुरी | प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील जनतेने विधानसभा निवडणुकीत महायुतीला स्पष्ट जनादेश दिला आणि राज्यात फडणवीस सरकार आले. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यावरून महायुतीमध्ये मोठ्या प्रमाणात वाद पाहायला मिळाला.

माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे मुख्यमंत्री पद दिले नसल्याने थोडे दिवस नाराज देखील होते. पण, त्यानंतर महायुतीने आपला सी एम पदाचा चेहरा जाहीर केला.

फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर काही दिवस मंत्रिमंडळ विस्तारावर खलबत्त झाले अन अखेरकार मंत्रिमंडळाचा विस्तार झाला. आता गेल्या काही दिवसांपासून पालकमंत्री पदावरून महायुतीमध्ये रस्सीखेच सुरू असल्याच्या चर्चा रंगत आहेत. मंत्रिमंडळाच्या विस्तारानंतर पालकमंत्री पदावरून महायुतीमध्ये



वाद झाल्याच्या बातम्या प्रसारमाध्यमांमधून समोर येत आहेत. मात्र आता महायुती मध्ये समाविष्ट असणाऱ्या तिन्ही घटक पक्षांच्या माध्यमातून यावर तोडगा काढण्यात आला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या तिन्ही नेत्यांनी आता पालकमंत्री पदावरून अंतिम निर्णय घेतला आहे.

यामुळे लवकरचं कोणत्या जिल्ह्याचे पालकमंत्री पद कोणाला मिळणार हे स्पष्ट होणार आहे. तत्पूर्वी आपण संभाव्य पालकमंत्र्यांची नावे पाहणार आहोत. राज्यातील सर्व जिल्ह्यांच्या संभाव्य पालकमंत्र्यांची यादी आमच्या हाती आली असून आज आपण हीच यादी पाहणार आहोत.राज्यातील क्षेत्रफळाच्या दृष्टीने सर्वात मोठा जिल्हा म्हणजेच अहिल्या नगर जिल्ह्याचे पालकमंत्री पद हे भारतीय जनता पक्षाच्या वाटेला आले असून या ठिकाणी नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांना पुन्हा एकदा संधी देण्यात आली आहे. गेल्या वेळीही राधाकृष्ण विखे पाटील हेच नगरचे पालकमंत्री होते आणि यंदाही अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री पद राधाकृष्ण विखे पाटील यांच्याचं पारड्यात पडण्याची दाट शक्यता आहे.

## जिल्हानिहाय संभाव्य पालकमंत्र्यांची नावे

अहिल्यानगर : राधाकृष्ण विखे पाटील
नागपूर - चंद्रशेखर बावनकुळे
ठाणे - एकनाथ शिंदे
पुणे - अजित पवार
बीड - अजित पवार
सांगली - शंभूराज देसाई
सातारा - शिवेंद्रराजे भोसले
छत्रपती संभाजी नगर - संजय शिरसाठ / अतुल सावे
जळगाव - गुलाबराव पाटील / भाजपाचा देखील दावा आहे
यवतमाळ - संजय राठोड / भाजपाचा दावा देखील आहे
कोल्हापूर - हसन मुश्रीफ
अकोला - माणिकराव कोकाटे
अमरावती - चंद्रकांत पाटील
भंडारा - राष्ट्रवादी अजित पवार
बुलढाणा - आकाश फुंडकर
चंद्रपूर - नरहरी झिरवळ
धाराशीव - धनंजय मुंडे
धुळे - जयकुमार रावल
गडचिरोली - एकनाथ शिंदे
गोंदिया - राष्ट्रवादी अजित पवार
हिंगोली - आशिष जैस्वाल
लातूर - गिरीष महाजन
मुंबई शहर - योगेश कदम
मुंबई उपनगर - मंगलप्रभात लोढा
नांदेड - भाजपाकडे राहिल
नंदुरबार - भाजपाचा दावा
नाशिक - दादा भुसे / गिरीश महाजन यांचा देखील दावा
पालघर - गणेश नाईक
परभणी - मेघना बोर्डीकर
रायगड - भरत गोगावले / राष्ट्रवादीचा दावा कायम
सिंधुदुर्ग- नितेश राणे
रत्नागिरी - उदय सामंत
सोलापूर - जयकुमार गोरे
वर्धा - पंकज भोयर
वाशिम - माधुरी मिसाळ / इंद्रनील नाईक
जालना - अतुल सावे
लातूर - बाळासाहेब पाटील

# राजेंद्र सावंत यांना राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्काराचा मानाचा सन्मान!

**पाथर्डी | प्रतिनिधी**

नाशिक येथील दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर पत्रकार संघाने पत्रकारिता क्षेत्रातील प्रतिष्ठेचा राष्ट्रीय कर्मयोगी पुरस्कार २०२५ पाथर्डीचे सन्माननीय पत्रकार राजेंद्र सावंत यांना जाहीर केला आहे. पत्रकारिता क्षेत्रात सतत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सावंत यांची ही निवड त्यांच्या अद्वितीय योगदानाची पावती आहे.

२०११ साली पत्रकारिता क्षेत्रात पदार्पण करणारे सावंत यांनी गेल्या दशकभरात विविध विषयांवर विस्तृत लेखन केले आहे. त्यांनी शेती, सहकार, शैक्षणिक प्रगती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण भागातील शांतता प्रस्थापनेसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांच्या लेखणीतून नेहमीच समाजातील उपेक्षित घटकांना आवाज मिळाला आहे.महिला बचत गटांना मार्गदर्शन करणे, चळवळींना चालना देणे आणि ग्रामीण भागात आर्थिक साक्षरता वाढवणे हे त्यांच्या



कामाचे मुख्य गमक राहिले आहे. संजय गांधी निराधार योजना सदस्य म्हणून त्यांनी वंचित घटकांसाठी सातत्याने योगदान दिले आहे. त्यांच्या प्रयत्नांमुळे अनेक महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या आहेत, तर सामाजिक क्षेत्रात सकारात्मक बदल घडवण्यासाठी त्यांनी विविध चळवळींना हातभार लावला आहे.

### पुरस्कार वितरण सोहळा

**हा मानाचा पुरस्कार ५ जानेवारी २०२५ रोजी नाशिक येथे एका भव्य सोहळ्यात प्रदान केला जाणार आहे. यावेळी खासदार राजाभाऊ वाजे, गुणवंत कामगार मंडळाचे अध्यक्ष भारती चलवडे, आणि नाशिक रोटरी क्लबचे अध्यक्ष ब्रह्मदेव रावत आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सावंत यांच्या या सन्मानामुळे तालुक्यातील नागरिकांमध्ये अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.**

### प्रेरणादायी कार्य

**सावंत यांचे कार्य आज फक्त पाथर्डी तालुक्यापुरते सीमित नसून संपूर्ण राज्यासाठी प्रेरणादायी ठरले आहे. त्यांनी अनेक वंचितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले आहेत. त्यांचे कार्य पत्रकारितेच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.**

### संपूर्ण तालुक्याचा अभिमान

**राजेंद्र सावंत यांना मिळालेला हा सन्मान त्यांच्या प्रामाणिक आणि कर्तव्यनिष्ठ सेवेला दिलेली मोठी दाद आहे. त्यांच्या यशामुळे पाथर्डी तालुका आणि सगळ्या नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत.**

## सावित्रीबाई फुले जयंती उत्साहात साजरी

# तारसा बूज आणि भंगाराम तळोधीत विविध उपक्रम



**गोंडपिपरी | प्रतिनिधी**

महिला शिक्षण आणि सशक्तीकरणाचे प्रतीक सावित्रीबाई फुले यांची जयंती तारसा बूज आणि भंगाराम तळोधीत मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

तारसा बूज येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले यांची भूमिका साकारत नृत्य आणि गीत सादर केले. सावित्रीबाई फुले यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत उपस्थितांना त्यांच्या कार्याचा संदेश देण्यात आला. सावित्रीबाई फुले यांनी महात्मा ज्योतिबा फुले यांच्या मार्गदर्शनाखाली स्त्रियांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मोठे कार्य केले. त्यांनी दाखवलेल्या मार्गावर चालत महिलांनी आज सर्व क्षेत्रांमध्ये यशस्वी भरारी घेतली आहे.

भंगाराम तळोधी येथे क्रांतीपर्व प्रभाग संघाच्या वतीने महिलांसाठी आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये रक्तगट तपासणी, रक्तदाब तपासणी आणि 'आभा कार्ड' वितरणाचा समावेश होता. या शिबिराचा अनेक महिलांनी लाभ घेतला.

कार्यक्रमाचे उद्घाटन माजी जिल्हा परिषद सदस्य वैष्णवीताई अमर बोडलावार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून रत्नमाला भडके, कांता भडके, माणिकचंद उराडे, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ. निखिलेश नागतोडे, वैद्यकीय अधिकारी धात्रक, ग्राम पंचायत सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य यांची उपस्थिती होती. महिला आणि स्थानिक नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला यशस्वी केले. सावित्रीबाई फुले यांच्या जयंती निमित्ताने झालेल्या या उपक्रमांनी महिला सशक्तीकरणाचा संदेश प्रभावीपणे दिला.

# शिव पानंद शेतरस्त्यांच्या प्रश्नांवर १७ फेब्रुवारीला अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा

## जिल्हाधिकाऱ्यांच्या महाराजस्व अभियानाची तालुका प्रशासकडून पायमल्ली

**पारनेर | प्रतिनिधी**

विभाजनानंतर शेतजमिनींची होत चाललेली तुकडेवारी यामुळे शेतरस्त्यांचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला असुन अहिल्यानगर जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य शिव पानंद शेतरस्ते खुल करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर महाराष्ट्र शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून प्रशासणाचे लक्ष वेधण्यासाठी पेरू वाटप आंदोलन करण्यात आले यावेळी सन्माननीय जिल्हधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी विशेष मोहीम हाती घेवून जिल्ह्यात महाराजस्व अभियानाचे परिपत्रक काढून कालबद्ध कार्यक्रम राबवण्याच्या सुचना तहसिल कार्यालयांना दिल्या परंतू तहसिल कार्यालयांकडून या अभियानाला केराची टोपली दाखवण्यात आली त्यामुळे शेतकऱ्यांचा शेतरस्त्यांचा प्रश्न जैसे थे राहीला आहे या महाराजस्व अभियानाची दखल घेत इतर जिल्ह्यांमध्ये तहसिल कार्यालयांकडून यशस्वी उपक्रम पार पडत



आहे परंतु अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा,नेवासा आदी तालुके सोडता कुठेही यावर प्रत्यक्ष कार्यवाही करण्यात आलेली नाही महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या माध्यमातून राज्यभर आंदोलन चालु असताना श्रीगोंदा तहसिल कार्यालयाकडून विशेष सहकार्य लाभत आहे या तालुक्याला मॉडेल म्हणून घोषीत करण्यासाठी जिल्हा प्रशासणाणे विशेष कृती आराखडा तयार करावा, तहसिलवर शुन्य रस्ता केसेस ठेवाव्यात, भूमिअभिलेख कार्यालयामधे असणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तुटवडा भरून काढणे, उच्च न्यायालय छत्रपती संभाजीनगर येथे पारनेर तालुक्यातील दाखल निकालानुसार ६० दिवसांच्या आत शेतरस्ते खुले करून द्यावेत, शिव पानंद शेतरस्ते खुले करताना शासकीय कामात अडथळा आणल्या कारणाने संबंधितांवर तातडीने फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दिल करून दंड आकारण्यात यावा,अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व तालुकयातील शिव पाणंद शेतरस्ते अतिक्रमण मुक्त करण्यासह विविध मागण्यांचे निवेदन महाराष्ट्र शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे, राज्य समन्वयक दादासाहेब जंगले पाटील यांनी चळवळीच्या वतीने दिले असुन वरिल मागण्या मान्य न झाल्यास दि. १७/०२/२०२५ रोजी अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयावर महामोर्चा काढण्याचा ईशारा प्रशासणास दिला आहे.

**अहिल्यानगर जिल्ह्यात पुन्हा नव्याने महाराजस्व अभियान राबवावे,तहसिल कार्यालयांकडून शेतकऱ्यांची होणारी विवंचना,शेतरस्ता केसेस सुनावणीतील दिरंगाई, शेतरस्त्यांअभावी पडीक राहणाऱ्या भुधारकांना विनाअट नुकसान भरपाई मिळावी त्याचबरोबर तहसिल कार्यालयात शेतरस्ता केसेसमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी शेतकऱ्यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या समोर तालुका प्रशासणाची बैठक लावावी आदी मागण्यांसाठी महाराष्ट्र राज्य शिवपानंद शेतरस्ता चळवळीच्या शरद पवळे/दादासाहेब जंगले पाटील यांनी जिल्हाधिकार्यालयावर महामोर्चाचा ईशारा दिला आहे.**

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त दिनदर्शिकेचे प्रकाशन



**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा शहरातील क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या स्मारकाजवळ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सोमनाथ बोराटे, अतुल बनसोडे, नवनाथ मोहोळकर, हनुमंत भोंग, मधुकर शिंदे, गजेंद्र नाळे, विपुल पुजारी (न.पा. अधिकारी), अशोक दुधे, चंद्रकांत रोडे, अभिजीत दुधे, अंकुश जाधव यांसह विविध मान्यवर उपस्थित होते.महिला नेतृत्व म्हणून अनिता राऊत (अध्यक्ष, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषद, महिला ता. करमाळा), माधुरी परदेशी (अध्यक्ष, ग्राहक मंच करमाळा), डॉ. मोटे, अनिता शिंदे, स्वाती मोहोळकर, भुजबळ, आणि मंगल मोहोळकर यांनी देखील उपस्थित राहून कार्यक्रमाला गौरव प्राप्त करून दिला.कार्यक्रमात सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचे स्मरण करून त्यांचे प्रेरणादायी विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

# श्रीक्षेत्र कोल्हार भगवतीपुर येथील भगवती मातेचा यावर्षीचा यात्रा महोत्सव मोठ्या थाटामाटात

**कोल्हार | प्रतिनिधी**

श्रीक्षेत्र कोल्हार भगवतीपुर येथील ग्रामदैवत श्री भगवती माता यात्रा महोत्सवाच्या नियोजनासाठी श्री भगवती माता मंदिरात झालेल्या देवाला ट्रस्ट व ग्रामस्थांच्या बैठकीत १३ जानेवारीपासून सुरू होत असलेल्या पौष पौर्णिमा ते माघ पौर्णिमा असा महिनाभर चालणाऱ्या यात्रा महोत्सवाच्या नियोजनाबाबत बैठक पार पडली.

या यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने अभिषेक तसेच धार्मिक कार्यक्रमांसोबत कुस्त्यांचा हंगामा व टांगा शर्यत असे कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरे करण्याबाबत या बैठकीत निर्णय झाला.

१३ जानेवारी या पौष पौर्णिमेच्या दिवशी सकाळी अभिषेक, शेंदूर लेपण व महाआरती होणार असून परंपरेप्रमाणे संध्याकाळी देवीच्या पालखीची सव्वाद्य मिरवणूक निघणार आहे. दुसऱ्या दिवशी श्री भगवती माता देवी मंदिराच्या प्रांगणात लोक कलावंतांच्या हजेऱ्यांचा कार्यक्रम होणार असून दुपारी कुस्तीचे फड रंगणार आहेत, कुस्त्यांच्या हंगामासाठी नामांकित पैलवान हजेरी लावणार आहे यंदा पैलवानांसाठी भरघोस रकमांच्या बक्षीस सोबत गदा, ढाल देखील दिली जाणार आहे. त्यानंतर १५ जानेवारी रोजी घोडा बैल शर्यतीचा थरार रंगणार असून विजेत्या स्पर्धकांना भरघोस रकमेची रोग बक्षिसे दिली.

यंदाचा यात्रा उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा करण्यासाठी श्री भगवती माता देवालय ट्रस्ट व ग्रामस्थ प्रयत्नशील आहे. सर्व ग्रामस्थांनी तन मन धनाने संपूर्ण सहकार्य करावे असे आव्हान भगवती माता देवालय ट्रस्टचे अध्यक्ष सयाजी खर्डे, खजिनदार आणि



प्रवरा सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ.भास्करराव खर्डे, मा. सरपंच ड सुरेंद्र खर्डे यांनी केले उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यात्रा वर्गणीचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी देवालय ट्रस्टचे उपाध्यक्ष साहेबराव दळे, विजय निबे, वसंतराव खर्डे, अजित मोरे संभाजी देवकर सुजय राऊत, श्रीकांत खर्डे पंढरीनाथ खर्डे बाबासाहेब दळे, लक्ष्मणराव खर्डे नंदकुमार खांदे भगवतीपुरचे उपसरपंच प्रकाश खर्डे ऋषिकेश खांदे,पांडुरंग देवकर, अनिल खांदे, आबासाहेब मोरे, दिलीप खांदे मधुकर खर्डे प्रशांत खर्डे आदीसह ग्रामस्थ उपस्थित होते. कोल्हार भगवतीपुर येथील श्री खांदे परिवारातर्फे दिवाली ट्रस्टला ५ लाख रुपयांची देणगी देण्यात आली असून त्या अंतर्गत साडेचार लाख रुपये खर्चून भगवती माता मंदिरात दहा किलो वॅट क्षमतेचे सोलर पॅनल बसविण्यात आले आहेत. तसेच महामार्गालगत उभारण्यात आलेल्या भगवती मातेच्या भव्य प्रवेशद्वार तसेच स्वागत कमानी वर ९० हजार रुपये खर्चून एलईडी पॅनल नामफलक बसविण्यात येणार आहे. येथील भाविक श्री अरुण शिवाजी फोपसे व मंगेश रांका यांनी सुमारे ९० हजार रुपये खर्चून भाविक भक्तांसाठी वॉटर प्युरिफायर व कुलर देणगी स्वरूपात दिली तसेच येथील बी एम स्वीट से संचालक भानाराम चौधरी यांनी दीड लाख किमतीचा १६ फूट लांब पात्याचा सिलिंग फॅन बसवून दिला. या सर्व देणगीदार भाविकांचा देवालय ट्रस्ट तर्फे सत्कार करण्यात आला.